SHRI WAGHESHWAR GRAMVIKAS PRATISHTAN
Since 2008

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित

# श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे



# वाघेश्वर

## नियतकालिका २०२३

श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित

# श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे ☎:(०२१३७) २६२२२२

# वाघेश्वर

वार्षिक अंक - सन २०२२-२३

* संपादक *

प्राचार्य डॉ. लक्ष्मण किसनराव शितोळे

* कार्यकारी संपादक *

प्रा. रमेश अंबऋषी शितोळे

* संपादक मंडळ *

उपप्राचार्य प्रा.प्रविण कुरूमकर

प्रा. बाळासाहेब तावरे | प्रा.सौ. सुरेखा देशमुख | प्रा. निनाद पाडळे

प्रा. जयराम पवार | प्रा.सौ. सोनाली म्हेत्रे | प्रा. दत्तात्रय पवार

# दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती




| | | |
|---|---|---|
| • प्रकाशन स्थळ | : | श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे |
| • प्रकाशन कालावधी | : | जून २०२२ - ते एप्रिल २०२३ |
| • मुद्रकाचे नाव व पत्ता | : | सार्थक ऑफसेट, काष्टी |
| • राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| • टायपिंग व सेटींग | : | इंद्रजित नलगे |
| • प्रकाशकाचे नाव | : | प्राचार्य, डॉ.लक्ष्मण किसनराव शितोळे<br>श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे |
| • राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| • नियतकालिकेची मालकी | : | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संचलित<br>श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे |

मी प्राचार्य डॉ.लक्ष्मण किसनराव शितोळे असे जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

सदर अंकात व्यक्त करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

## आमचे आधारस्तंभ



मा.श्री. वसंतराव विनायकराव फराटे-पाटील

## आमचे प्रेरणास्थान



मा.श्री. राजीव वसंतराव फराटे-पाटील (साहेब)
संस्थापक अध्यक्ष
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान



मा.श्री. ज्ञानेश्वर वसंतराव फराटे-पाटील
संस्थापक उपाध्यक्ष
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान



मा.सौ. मृणाल राजीव फराटे-पाटील
संस्थापक सचिव
श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान

# मा.अध्यक्षांचे मनोगत



श्री वाघेश्वर ग्राम विकास प्रतिष्ठान संचलित श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा. ता. शिरूर जिल्हा पुणे सालाबाद प्रमाणे हे महाविद्यालय आपला वार्षिक अंक काढत आहे हे पाहून आनंद वाटला.

ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन त्यांना प्रगतीचे मार्ग खुले करून देण्यासाठी या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. मुला-मुलींची शिक्षणाची व ज्ञानाची भूक भागवून त्यांच्या पंखात महत्त्वकांक्षा आणि प्रेरणेचे बळ निर्माण करून उत्कर्षाच्या उत्तुंग अवकाशात भरारी मारण्याचे त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचा दृष्टिकोन या महाविद्यालयाच्या निर्मितीमागे आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी धडपडणारा हा व्यापक दृष्टिकोन प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न "वाघेश्वर" या वार्षिक अंकातून केलेला पाहून विशेष कौतुक वाटते. महाविद्यालयाची उपक्रमशील वाटचाल या अंकात निश्चितच प्रतिबिंबित झालेली आहे. महाविद्यालय आणि "वाघेश्वर" अंकासाठी धडपडणाऱ्या महाविद्यालयातील सर्व घटकाचे मी कौतुक करतो आणि हा अंक विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल, यासाठी मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

**मा.श्री. राजीव वसंतराव फराटे पाटील**
संस्थापक अध्यक्ष, श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण
मांडवगण फराटा

# मा. सचिवांचे मनोगत



श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित, श्री वसंतराव फफराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडवगण फराटा. ता. शिरूर जि. पुणे हे महाविद्यालय आपल्या "वाघेश्वर" या वार्षिक अंकाची पुढील आवृत्ती काढत आहे. ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. मांडवगण फराटा सारख्या ग्रामीण परिसरात लावलेले श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे रोपटे पाहता पाहता वटवृक्ष म्हणून आकार घेत आहे याची जाणीव मनाला अत्यंत हर्षित करणारे आहे.

आजची युवा पिढी राष्ट्राच्या उज्वल भविष्याची शिल्पकार असते. ग्रामीण भागातील युवक - युवतींना उद्याच्या उज्वल भविष्याचे शिल्पकार होता यावे म्हणून त्यांना शिकून सवरून शहाणे करून स्वतःच्या पायावर उभे राहून प्रगती करण्याची संधी देणे अत्यंत गरजेचे असते. ग्रामीण भागातील समाजाची ही गरज ओळखून समाजाच्या आर्थिक सामाजिक समस्यातून धडपडणाऱ्या ग्रामीण मुलांना आणि विशेषतः मुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट या महाविद्यालयाच्या निर्मितीमागे होते ते प्रत्यक्षात आकार घेतानाचा प्रत्यय येतो आहे .

या "वाघेश्वर" अंकातून महाविद्यालयाची प्रगतशील आणि उपक्रमशील वाटचाल तर दिसून येतेच आहे. याशिवाय महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी आणि या महाविद्यालयासाठी धडपडणाऱ्या प्रत्येकाचे महाविद्यालयाच्या विकासासाठीचे अविरत प्रयत्न श्रम यांचेही प्रतिबिंब "वाघेश्वर" या अंकात उमटल्याशिवाय राहत नाही.

महाविद्यालयाची ही प्रगतशील वाटचाल उत्तरोत्तर वाढत जावो आणि "वाघेश्वर" हा अंक युवक - युवतींना प्रेरक, उद्बोधक ठरो अशी मनःपूर्वक शुभेच्छा देते.

धन्यवाद !

**सौ. मृणाल राजीव फराटे पाटील**
संस्थापक सचिव, श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण
मांडवगण फराटा

# मा.प्राचार्यांचे मनोगत



ग्रामीण भागातील व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त करून देण्याच्या उदात्त दृष्टीकोनातून श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण संस्थेने सन २००९ मध्ये श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. कायम विना अनुदान तत्वावर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे ह्या प्रमुख उद्देशाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजीव वसंतराव फराटे पाटील साहेब व त्यांचे संस्थेतील अन्य सहकाऱ्यांच्या सहकार्यातून संस्थेने श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना मौजे मांडवगण पराटा ता.शिरूर, जि.पुणे येथे केली.

शिक्षण हे जीवन उध्दाराचे सर्वाधिक प्रबख माध्यम आहे. हे ओळखून ग्रामीण भागातील मुला-मुलींना सर्वागिण विकासाबरोबर त्यांना आत्मनिर्भर बनविण्याची जिद्द हा महाविद्यालयाच्या स्थापनेपाठीमागचा प्रमुख उद्देश आहे. मांडवगण व परिसरातील विद्यार्थ्यी वर्ग हा आर्थिकदृष्या दुर्बल असून शेती किंवा शेतमजुरी हेच त्यांच्या कुटूंबाच्या उपजिविकेचे प्रमुख साधन आहे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने फी सवलत दिली जाते तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय शिष्टवृत्ती मिळवून देण्यात महाविद्यालय प्रयत्नशिल असते. **कमवा व शिका** या योजनेअंतर्गत गरीब विद्यार्थी वर्गास आर्थिक मदत मिळवून दिली जाते.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांचा विकास व्हावा, त्यांच्या अंगीभूत गुणांची वृध्दी व्हावी यासाठी महाविद्यालयाने विविध व्याख्याने, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर, रक्तदान शिबीर, राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रम, कृषीदिन, मतदार जागृती अभियान तसेच विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास इत्यादी उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयात केले जात आहे. या उपक्रमांकरीता विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांना सुयोग्य करण्याकरीता महाविद्याच्या वतीने निमंत्रित केले जाते.

महाविद्यालयाचे नियतकालिक हे महाविद्यालयाच्या प्रगती बरोबरच महाविद्यालयाच्या वार्षिक ठळक घडामोडीचा आरसा असते. **वाघेश्वर** नियकालिक अंक आपल्या हाती देता अत्यानंद होत आहे. त्याच बरोबर जाबाबदारीची जाणीव ही होत आहे. वाघेश्वर या वरिष्ठ महाविद्यालयाच्या नियतकालिका करिता संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.राजीवजी फराटे पाटील साहेब, संस्थेच्या सचिव मा.सौ.मृणाल राजीव फराटे पाटील मॅडम तसेच संस्था पदाधिकारी यांचे सहकार्य मिळत आहे. त्याच बरोबर पालक, विद्यार्थ्यावर्ग शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा.धनाजी कुरूमकर सर, तसेच वार्षिक अंक कार्यकारी प्रा.रमेश शितोळे व नियतकालिक पूर्ण करण्याकरिता मौजे काष्टी येथील सार्थक प्रिंटींग प्रेसचे श्री.नलगे यांनी मेहनत घेतली व अंक तयार करण्यात महाविद्यालय यशस्वी होत आहे.


**डॉ. लक्ष्मण किसनराव शितोळे**
प्राचार्य,
श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यलय, मांडवगण फराटा

# संपादकीय...



प्रिय विद्यार्थी,

मित्र मैत्रिणींनो आपल्या महाविद्यालयाचा इ.स. २०२२ २३ या शैक्षणिक वर्षाचा 'वाघेश्वर' हा वार्षिक अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थी रुपीपुष्पांना उच्च शिक्षण, संस्कार, गुण, मूल्य आणि विविध कौशल्याने स्वयंप्रेरित करून समाजाला अर्पण करण्याचा उदात्त प्रयत्न महाविद्यालयाने अविरत चालू ठेवला आहे. याच प्रयत्नातून निर्मिलेले हे सुसंस्कारित सामर्थ्यशाली युवक- युवती समाजाच्या विकासाची सुवर्ण पाऊलवाट तळपत ठेवतील अशी खात्री महाविद्यालयास आहे. युवकांच्या व समाजाच्या निर्मितीच्या उत्तुंग भविष्याचा वेध घेणारा उज्वल प्रेरणादायी विचार म्हणजे 'वाघेश्वर'. निसर्गाने दिलेला सर्वश्रेष्ठ वरदान म्हणजे तारुण्य. अफफाट शक्तीचा स्फफूर्तीचा आणि अशक्य ते शक्य करून दाखविण्याचा काळ म्हणजे तारुण्य असते. या तळपत्या शक्तीला ज्ञानाचे भांडार खुले करून स्व- प्रकटीकरणासाठी एक नवे व्यासपीठ मिळवून देण्याबरोबरच महाविद्यालयाच्या प्रगत वाटचालीचेही दर्शन घडविता येणारा वार्षिक अंक 'वाघेश्वर' हा एक राजमार्ग आहे.

या अंकात आई- वडील, परमेश्वर, गुरु, आदर्श व्यक्तिमत्व, मित्र, प्रेम, वेळ या विषयापासून शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, प्रदूषण, चंगळवादी वृत्ती या समस्या आणि वैज्ञानिक प्रगती, दृष्टिकोन, शेती विकास संशोधन या विषयापर्यंत विविध विचार विद्यार्थ्यांनी मांडले आहेत. वर्षभर महाविद्यालयाने विविध विभागांतर्गत राबविलेल्या उपक्रमांचे व उपक्रमशील वाटचालीचे दर्शन या अंकात घडल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे. गुणवंताच्या गौरवाने फफुललेले आणि सोज्वळ विचारांनी सुगंधित झालेले 'वाघेश्वर' हे नियतकालिक सिद्ध होत असताना अनेकांचे सहकार्य लाभले. माननीय संस्था पदाधिकारी, विश्वस्त, सदस्य, सभासद, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद, प्राध्यापकेतर कर्मचारी, संपादक मंडळातील सर्व सदस्य महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच सार्थक प्रिंटर्स काष्टी या सर्वांचे विशेष सहकार्य या अंकासाठी लाभले आहे. या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो आणि आपल्या सर्वांच्या ऋणात राहणे पसंत करतो. महाविद्यालयाचे हे वार्षिक अंक 'वाघेश्वर' सर्वांच्या पसंतीला उतरेल हीच आशा. धन्यवाद

**प्रा. रमेश अंबऋषी शितोळे**
कार्यकारी संपादक
श्री वसंतराव फराटे-पाटील कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यलय, मांडवगण फराटा




राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित हिमोग्लोबीन तपासरी शिबिर प्रसंगी उपस्थित मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना योजना दिवस कार्यक्रमात कोर्स पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र स्विकारताना स्वयंसेवक



हर घर तिरंगा या कार्यक्रमात सहभागी संस्था सचिव मा.सौ.मृणाल पराटे पाटील मॅडल व उपस्थिती महिला स्टाफ आणि विद्यार्थीनी



राष्ट्रीय सेवा योजना दिवस कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा.मनोज वाबळे सर व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



अजिवन अध्ययन व विस्तार विभाग आयोजित व्याख्यानमालेसाठी उपस्थित मान्यवर



तृतीय वर्ष वाणिज्य वर्गास निरोप समारंभानिमित्त मार्गदर्शन करताना संस्था अध्यक्ष.मा. राजीव फराटे पाटील साहेब



राष्ट्रीय सेवा योजना शिबीर मौजे पिंपळसुटी येते उद्घाटन कराताना सरपंच मा.नितीन फलके व प्राचार्य प्रविण कुरूमकर रासेयो अधिकारी प्रा.जयराम पवार



अजिवन अध्ययन व विस्तार विभाग आयोजित विवाहपूर्व समुपदेश कार्यक्रमाचे उद्घाटन करताना संस्था सचिव मा.मृणाल फराटे पाटील मॅडम, मार्गदर्शक डॉ.दिपाली जाधव, डॉ.सुरेश जगताप व मान्यवर



तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाच्या निरोप समारंभ प्रसंगी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी




रासेयो शिबिर दरम्यान वृक्षारोपन करताना संस्था सचिव मा.मृणाल फराटे पाटील मॅडम, उपाध्यक्ष मा.ज्ञानेश्वर फराटे पाटील सरपंच नितीन फलके व मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना दिवस निमित्त अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य प्रविण कुरूमकर सर



राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीर उद्गाटन प्रसंगी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करताना संस्था उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटा व मा.सभापती प्रकाश पवार व उपस्थित ग्रामस्थ



डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.राजीव फराटे पाटील साहेब व मान्यवर



वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांशी संवाद साधताना संस्था अध्यक्ष मा.राजीव फराटे पाटील साहेब



राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त कार्यक्रमात सहभागी प्राचार्य प्रविण कुरूमकर व उपस्थित प्राध्यापक वृंद



रासेयो शिबीर पिंपळसुटी येथे दिपप्रज्वलन करताना उपस्थित मान्यवर



पथनाट्याव्दारे जनजागृती करताना रासेयो शिबिरातील सहभागी स्वयंसेवक



बीबीए विभाग शैक्षणिक सहल महाबळेश्वर येथे सहभागी झालेले विद्यार्थी व विभागातील प्राध्यापक वृंद



राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आयोजती हिमोग्लोबीन तपासणी शिबीराचे उद्घाटन करताना संस्थेच्या सचिव सौ.मृणाल फराटे पाटील मॅडम व उपस्थित मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित हिमोग्लोबीन तपासणी शिबीरात मार्गदर्शन करताना डॉ.मंजुषा सातपुते मॅडम



राष्ट्रीय सेवा योगना व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित हिमोग्लोबीन तपासणी शिबिरात मार्गदर्शक डॉ.मंजुषा सातपुते यांचा सत्कार करताना सचिव मा.मृणाल फराटे पाटील मॅडम व उपस्थित मान्यवर




IIIII



बी.सी.एस. विभाग आयोजित गेस्ट लेक्चरमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.किरणकुमार जोहरी



विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेमध्ये ग्रंथालयात काम करताना विद्यार्थीनी



डॉ.ए.पी.जी.अब्दुल कलाम जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी



सांस्कृतिक विभाग व बी.सी.एस. विभाग आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक बी.के. वैशाली यांचा सत्कार करताना प्राचार्य प्रविण कुरूमकर



शिक्षक दिन निमित्त डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करताना महाविद्यातयाचे प्राचार्य प्रा.प्रविण कुरमकर सर व उपस्थित सर्व स्टाफ दिसत आहे.



विद्यार्थी विकास मंडळ आयोजित निर्भय कन्या अभियान अंतर्गत विद्यार्थीनींना स्वसंरक्षणाचे धडे देताना कराटे प्रशिक्षक श्री. सचिन पवार व सहकारी



विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेमध्ये ग्रंथालयात काम करताना विद्यार्थीनी

# भावपूर्ण श्रध्दांजली...!



सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात
वाघेश्वर नियतकालिक प्रसिध्द होण्याआगोदर प्रसिध्द साहित्यिक,
राजकीय नेते, कलावंत, समाजसेवक, राजकीय नेते, कलावंत,
समाजसेवक, शास्त्रज्ञ, स्वातंत्र्यसैनिक, सीमवरील सैनिक,
विविध क्षेत्रातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्ति तसेच आमच्या
संस्थेशी संबंधित व्यक्ती, हितचिंतक, पदाधिकारी, प्राध्यापक,
व इतर कर्मचारी व विद्यार्थीनी यांच्या घनिष्ठ
नात्यातील व्यक्ति-दिवंगत झाल्या त्यांना
अपूर्वसंपदाची भावपूर्ण श्रध्दांजली...!
ईश्वर अनंतात विलीन आत्मांना चिरशांती देवो...!

# Shri Vasantrao Pharate Patil College Mandavgan Pharata


## Vision

Our vision is to impart quality higher education to the students, girl students, in particular, from the rural area and to train and develop the youth as responsible citizens with multidimensional personalities significantly contributing to the building of our nation.

## Mission

To start educational institutions such as pre-primary, primary, secondary and higher secondary and ashram schools, D. Ed. and B. Ed. colleges, night school and college, technical, paramedical and engineering colleges, D. Pharmacy and B. Pharmacy, Institutes of computer training and medical research as well.

- To make the facility of quality higher education available to the students, girl students, in particular, from the rural area and to train and develop the youth as responsible citizens.
- To give full support to the poor and orphan children by giving them educational scholarships, free books and other educational equipments and by giving them free access to libraries.
- To introduce and effectively conduct adult education programme.
- To give medical help to poor and the needy, conduct health awareness camps, provide mobile hospitals and health services and blood bank services.
- To start educational institution for the specially disadvantaged students and to give them required instruments and appliances.
- To promote and strengthen scientific education and research culture at Mandavgan Pharata and its vicinity.
- To make the facility of hostels available to needy ladies, children and widows.
- To start orphanage for the children of widows.
- To organize faculty development programmes leading to the improvement of the quality of the institute.
- To establish and strengthen linkages with various bodies and agencies such as firms and industries, academic and professional institutions, and NGOs for better higher education and placement opportunities to be provided to the students.
- To highlight the importance of human rights and responsibilities leading to the strengthening of nationalism among the students.



माझा मराठाचि बोलू कौतुके।
परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥

# कविमनाचे पान...



## एकदा तरी येऊन जा

सहवास तुझा देऊन जा खख
तहानलेल्या रानाला
सुकलेल्या पिकाला
आभाळातून बरसणारा तू
शेतकऱ्यांच्या डोळ्यातून वाहून जा ।। १ ।।

व्याकुळलेल्या पक्षांना
कोमेजलेल्या फुलांना
भुकेलेल्या गाई वासरांना
मायेचा घास तू भरून जा ।। २ ।।

खड्ड्यातील डबक्यांची
कोरड्या पडलेल्या नदी नाल्यांची
तुंबलेल्या धरणांची
वाट मोकळी करून जा ।। ३ ।।

आसुसलेल्या मनांना
सुकलेल्या ओठांना
प्रेमात पडलेल्या जीवांना
हाक तू देऊन जा ।। ४ ।।

अडगळीत पडलेल्या छत्रीसाठी
दुकानात लटकलेल्या रेनकोटसाठी
डगमगलेल्या अर्थव्यवस्थेसाठी
भक्कम कणा तू होऊन जा ।। ५ ।।

वाफफ़ाळलेल्या चहाची
गरमागरम भज्यांची
शेगडीवरील कणसांची
चव तू घेऊन जा ।। ६ ।।

फफ़ेसबुक वरील पोस्टसाठी
व्हॉट्सअप च्या स्टेटससाठी
इंस्टाग्राम च्या स्टोरीसाठी
एक तरी पोज देऊन जा ।। ७ ।।

स्वलिखित
सहा. प्रा. सुरेखा विठ्ठल देशमुख

## आयुष्य

बालपण गेलं, तरुण पण गेलं
म्हातारपण न्यायला आलं
हळूहळू तेही थकलं
धावत पळत जाऊन त्यानं
जीवन मृत्यूच्या स्वाधीन केलं
जाता जाता प्रश्न केला
सांग आता पुढचं आयुष्य
कुणाचं दिलं ?

खोरे संग्राम
एफ.वाय.बीसीए

## बोलतो मराठी

बोलतो मराठी ।
झालो खरेच धन्य बोलतो मराठी ।
मराठी आमुची बोली ।।१।।

सदामुखी मातृभाषा।
माय मराठी या मनामनांत ।
दऱ्याखोऱ्या वास करते मराठी।।२।।

या महाराष्ट्राच्या मातीत रंगते मराठी ।
मराठी राजभाषा महाराष्ट्राची वंदन।
माझे माय मराठीला ।।३।।

स्वलिखित
चैताली महादेव थोरात

## आईचं प्रेम

आईचं प्रेम म्हणजे नक्की काय असतं ?
आपण आजारी असताना
रात्रभर आपल्यासाठी जागणारी
म्हणजे आईचं प्रेम......

आईचं प्रेम म्हणजे नक्की काय असतं?
डब्यात एक चपाती सांगितली
तर तिने एक जास्त चपाती ठेवना
म्हणजे आईचं प्रेम......

आईचं प्रेम म्हणजे नक्की काय असतं ?
आपण चुकलो तर कधी
आपल्याला समजून सांगणारे ती
म्हणजे आईचं प्रेम......

आईचं प्रेम म्हणजे नक्की काय असतं?
एक वेळेस जग नाहीसं होईल
पण तिची आपल्यावरची माया
कधीही न संपणारे प्रेम
म्हणजे आईचं प्रेम......

आईचं प्रेम मोजताना न येण्यासारखं आहे.

गांगुर्डे अश्विनी
एफ.वाय.बी.कॉम

## उत्तम लक्षण

संगत असावी सुंदर विचारांची
रंगत द्यावी त्यांचा गुणांची
आदर्श घ्यावा थोर व्यक्ती संतांचा
फफुलाप्रमाणे आनंदी राहावे ।।१।।

वृक्षा सारखे निस्वार्थ असावे
नम्र रहावे गुरु-शिष्यांसारखे
स्वभावात असावा मधुरेचा गोडवा
माणुसकीने जपा नात्याची बंधने ।।२।।

आनंद घ्यावा क्षणाक्षणांचा
मित्र असावा कृष्णासारखा
सारथी असावा श्रीहरीसारखा
मन असावे गंगा जलासारख ।।३।।

पुस्तकासारखा गुरु असावा
कर्णासारखे दानशूर असावे
निसर्गरम्य स्थळी रममान व्हावे ।।४।।

स्वलिखित
थोरात चैताली महादेव

## गुरु

वह अंधकार युग था
जब था अज्ञानता का वासा
अर्थहीन जीवन था
जब नया गुरुही पास ||1||

दो शब्दों का यह मिलन
है ज्ञान का भंडार
जिसके बिना जीवन की
यह दौड मे है हार कि हार ||2||

नमन हो उन सभी को
जिन्होंने पाठ पढाया है
झुको ना कभी अन्याय के सन्मुख
हर पल याद दिलाय है ||3||

गुरु वशिष्ठ और गुरुदेव
जन्म है भारत मे यही
कभी न भुलो ऊन वचनों को
जो थे उन्होने ही कहे||4||

प्रणाम करो हर गुरू को
पूजो उनकी प्रतिभा को ||5||

------ संग्रहित ------

संग्राम खोरे
एफ वाय बीसीए

## जिंदगी

हंसकर देखा रोकर भी देख लिया
पाकर देखा सोकर भी देख लिया
जिंदगी वही जी सकता है
जिसने अकेला जीना सीख लिया ||1||

काश दो दिल होते सीने मे
तो एक से पहला प्यार कर लेते
एक टूट जाता अक्सर प्यार में
तो दुसरे से जिंदगी गुजर लेते||2||

जिंदगी ऐसी मिली हमे
किसी के मुकाबले न रहे
इतने बुरे तो नही थे हम
की तुम्हारे प्यार के काबिल न रहे ||3||

मेरी जिंदगी मे गम के मेले लगे है
हर जीती हुई बाजी हारे हुए है
पत्थर फेके है जिसने उसे मै क्या कहू
अखिर वह मेरे दोस्तों के हि मारे हुए है ||4||

------ संग्रहित ------

संग्राम खोरे
एफ वाय बीसीए

## पंढरीचा वारकरी

पंढरीचा वारकरी
वारी करी पंढरीची
व्रत करी एकादशी ||1||

विठुरायाची पंढरी
जणू दक्षिणकाशी
तुळशीहार गळा
भाळी चंदनाचा टिळा ||2||

प्रातःसमयी विठूचे दर्शन
पंढरीचे वारकरी येती
विठुरायाच्या भेटीला
चंद्रभागेच्या तिरी ||3||

येती घरा तोची दिन आनंदाचा
पंढरी निवासा सखा पांडुरंग
पाऊले चालती पंढरीची वाट ||4||

पंढरीचा वारीसाठी
सज्ज झाल्या पाऊलवाटा
नामा म्हणे मज
दविल्या तिचा वाटा
शांतीच्या वाटा सुभटा ||5||

स्वलिखित
चैताली महादेव थोरात

## पावसा पावसा रुसलास का

पावसा पावसा रुसलास का
पावसा पावसा रुसलास का
शेतकरी राजाला विसरलास का

शेतकरी राजा बघतोय वाट
कधी पडेल तुझी गाठ

रान झाले वैराण
शेतकरी झाला आहे हैराण

वर बघून डोळे गेले
पाण्यापासून गुरे -ढोरे मेले

पाण्यावाचून जमिनीला पडल्या भेगा
आता तरी बरस की र मेघा

पावसा पावसा रुसलास का
शेतकरी राजाला विसरलास का

अश्विनी जगदाळे
प्रथम वर्ष वाणिज्य

## ध्येयाचे शिखर

जे अशक्य आहे, ते स्वप्न मला पाहायचं आहे
ज्या शत्रूचा कोणी पराभव करू शकत नाही,
त्याच्याशी मला युद्ध करायचा आहे .
कोणालाही सहन न होणार दुःख
मला सहन करायचा आहे
ज्या ठिकाणी शूरवीर जाण्यास कचरतात
तेथे मला धावून जायचंय
जे अक्षम्य आहे
त्याला मला दुरुस्त करायचा आहे
पवित्र आणि सत्य आहे
त्यावरच मला निष्ठा आणि प्रेम ठेवायचं आहे
तो दूरवरचा तारा मला आणायचा आहे
हीच माझी दुर्दम्य इच्छा आहे
तो तारा गाठण्याची

संग्राम खोरे
एफ वाय बीसीए

## बाबा

आत्ता देखील बाबा माझ्या सोबत तू हवा होता,
माझ यश पाहून तुला झालेला,
आनंद मला पहायचा होता...
चुकले जर कधी मी तर,

रागवणारा तू हवा होता,
मी दुःखी कधी असले तर,
मायेने हात फिरवणारा तू हवा होता....
प्रत्येकाजवळ बाबा नावाचा एक आधार होता,

पण माझा आधार मला सोडून कधीच गेला होता
देवाने माझा बाबा माझ्याजवळ पुन्हा
पाठवायला हवा होता,
पण माझ्यासोबत बाबा,

तुझा प्रवास एव्हढाच होता...
बाबा तू पुन्हा माझ्याजवळ यायला हवा होता,
पण नियतीचा खेळच काही वेगळा होता...
आयुष्याच्या प्रत्येक क्षणात माझ्यासोबत
बाबा फक्त आणि फक्त तू हवा होता.....

स्वलिखित
पल्लवी चंद्रकांत गवळी
द्वितीय वर्ष कला

## महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठू माऊली

आषाढी-कार्तिकी
वारकरी येती पंढरपूरा
दरसाल भक्त चंद्रभागेच्या
वाळवंटी करिती दाटी ||1||

पांडुरंगाची चरणी
आशीर्वाद दर्शन घेती
भक्त पुंडलिकासाठी
उभा राहिला मंदिरी||2||

भिवरेच्या तिरी
सावळा हरी
विठूचे रूप वर्णावे किती
सावळे सुंदर रूप मनोहर||3||

तुळशीहार गळा
भाळी चंदनाचा टिळा
गळा कौस्तुभ मनी
निळा पिवळा ||4||

पितांबर देवाला
शोभे राहि-रखुमाई
राणीया सकळा
ओवाळीती ||5||
राजा विठोबा सावळा
आवड देवाला
तुळशीची अन अबीर बुक्क्याची
सावळी मूर्ती विठुरायाची||6||

पाहता श्रीमुख
आनंद वाटे मना
नामा म्हणे धन्य झालो
आज देख लिया रखुमाईचा पती ||7||

स्वरचित
चैतन्य महादेव थोरात

## लम्हे

कुछ सालो बाद पल ये बहुत याद आयेंगे
जब हम अपने अपने मुकाम पर पहुच जायेंगे||

साथ गुजरे हुए लम्हे याद आयेंगे
पैसे तो बहुत होंगे
पर खर्च करने के लिए लम्हे कम हो जायेंगे||

आज साथ है तो गुस्सा होते है
कल एक एक याद के लिए तरस जायेंगे||

एक कप कॉफी याद दोस्तो की दिलाएगी
फिर सोचते सोचते आखे नम हो जाएगी||

इसलिये इन पलो को मिलकर जीलो फ्रेंड्स
क्यूकी जिंदगी इन पलो को
इन दिनों को फिरसे नही दोहराएगी||

फिरोदिया अभिषेक जयकुमार
एस वाय बी कॉम

## वसंतऋतू चैत्र

चैत्र ऋतू आला
वृक्षा फुटली कोवळी पालवी
निसर्गाची शोभा हिरवाईने नटली ||

आमराई मोहराने भरली
चैत्र ऋतूची पहाट उजाडली
नव्या रंगाची नवीन ऋतूची
सुरुवात झाली ||

जैसे ऋतुपतीचे द्वार
फळभार लावण्यासी
हिरवाई देखना हर्ष मनासी ||
व
ृक्ष आपुले मित्र
तयांना तोडू नका कोणी
चैत्र मासाची अदभुत कहाणी
वर्णावी किती ||

स्वलिखित
चैताली महादेव थोरात

## विझलो आज जरी मी

विझलो आज जरी मी
हा माझा अंत नाही
पेटून उद्या नव्याने
हे सामर्थ्य नाशवंत नाही||

छाटले जरी पंख माझे
पुन्हा उडेल मी
उडवू शकेल मला
अजून अशी भिंत नाही||

माझी झोपडी जाळण्याचे
केले कैक कावे
जळेल झोपडी अशी
आग ती ज्वलंत नाही ||

रोखण्यास वाट माझी
वादळे होती आतुर
डोळ्यात जरी गेली धूळ
थांबण्यास उसंत नाही ||

येतील वादळे पेटेल तुफान
तरी वाट चालतो
अडथळयांना भिउन अडखळणे
पावलांना उसंत नाही||

भिजलो आज जरी मी
हा माझा अंत नाही

कवी सुरेश भट
(संग्रहित अश्विनी जगदाळे)

## वृक्ष आपुले मित्र

वृक्ष आपुले मित्र
तयांना तोडू नका
कोणी देती फुले अन फळे
देती छाया अन ममतेची माया||1||

वृक्ष मदत करिती पर्जन्यासी
नका तोडू वृक्ष
वृक्ष निसर्गाची शोभा
वृक्षवल्ली वनचरे ||2||

तयांचा करूया आदर वृक्ष
न मानिती मान-अपमान
सदा राहती नम्र
मानसन्मान त्यांना समान ||3||

राखा वृक्षांचा मान
करा वृक्ष दान
तिची महान काम
वृक्ष आमुचा प्रिय सखा ||4||

तया नका तोडू
वृक्ष देतील सुखाचा सहवास
वृक्ष संवर्धन करूया
वनराईचे जतन करू
निसर्गाची शोभा वाढूया ||5||

स्वलिखित
थोरात चैताली महादेव
बीसीए

## शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय

शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय
शिवविचारांवर चालून
जिजाऊंची रणरागिणीच बनायचंय
शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय ||

स्त्रीने फक्त चूल आणि मुल सांभाळावं
या बोथक विचारांना मागे सारायचय
शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय||

महाराणी येसूबाई व ताराबाई
सारखं स्त्री अस्तित्वाचं
कोंदण मनात कोरून सक्षम व्हायचंय
शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय||

स्त्री कडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्या
नराधमास शिवदंडक द्यायचंय तर
कष्टाळू शेतकऱ्यांच्या हृदयात
पेटणाऱ्या वनव्यास गनिमी कावा बनायचंय
शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय||

लोकांचा सुपीक मनात
जातीपातीच्या नावाखाली धार्मिक
विषमतेची कुविचारांची होणारी पेरणी
थांबवायची तर शाहू शिवराय आंबेडकर
विचारधारा मना मनात रुजवायचीये
शिवराय मला तुमची शिवकन्या व्हायचंय ||

कवियत्री सायली ढवळे
एस वाय बीसीए

## श्रावणमासी हर्ष मनासी

श्रावणमासी हर्ष मनासी
हिरवळ दाटली चोहीकडे
तरुंना फुटली कोवळी पालवी ||1||

पावसाळयाच्या दिवसात आनंद वाटे
मना पाहता या सुंदर मेघांना
लहान थोर वाट पाहतात
चातकासारखी या पावसाळयाची ||2||

नभा दाटली शोभा
दिसे सुंदर पावसाळयात इंद्रधनुची कमान
पावसाळयाची प्रभात किती मोहक ||3||

सुंदर वर्षा ऋतूत सरिता सागर तुडुंब भरती
संत वाहते नदीचे पाणी
पक्षी गाती मंजुळ गाणी ||3||

पावसाळयात मयूरांचा थवा
करील नृत्य काय हा सोहळा
वर्षा ऋतूचा बहुत आगळा
हा पर्जन्य काळ ||4||

प्रारंभ होतो मेघदूताचा
आषाढ मासी
चार मास समारंभ वर्षा ऋतूचा ||5||

------ संग्रहित ------

स्वलिखित
थोरात चैताली महादेव
बीसीए

## सदाचार

सुंदर विचारांची संगत केली
आचरणात गोड रंगत आली
शुद्ध असावी वाणी
मुखी शब्द जसा ||1||

मधुरेचा गोडवा
सत्य बोलावे सदा
मान अपमान
मानावा समान ||2||

निस्वार्थी असू द्यावा स्वभाव
चित्त असावे समाधान
मुखी राम नाम उच्चारा
प्रात-समयी नमस्कार देवाला ||3||

थोर व्यक्तीचा करा आदर
एकमेकांविषयी असूदेवा प्रेमभाव
हाच खरा धर्म
वाचावी ज्ञानेश्वरी ||4||

डोळा पहावी पंढरी
वारी करावी पंढरीची
विनवी कवी/कवयीत्री
करा सदाचार हाच आपुला धर्म ||5||
स्वलिखित
चैताली महादेव थोरात

स्वलिखित
थोरात चैताली महादेव
बीसीए

## जीवनातील सत्य

सत्य बोला
चांगले विचार आचारा
मुखी असावी  मधुर वाणी
वागणे असावे सत्य ||1||

जीवन असावे निस्वार्थ
जीवनात करावा
एकदा तरी परमार्थ ||2||

होईल जीवन सार्थ
कीर्ती-अपकीर्ती घ्या जाणून
स्वहिताच्या खुणा  घ्या  समजूनी ||3||

मान-अपमान समान
सत्य-असत्याचा तोल सावरावा
चित्त असू द्यावे समाधान ||4||

प्रत्येक क्षणांचा आनंद घ्यावा
प्रात-समयी नमन करावे देवरायाला
आनंद होई मनाला ||5||

स्वलिखित
चैताली महादेव थोरात

## आपलं फक्त लक्ष नसतं

संकटांना कधी कंटाळायचं नसतं
त्याला समोरच जायचं असतं
कोणी नावे ठेवली तर
थांबायचं नसतं||1||

आपलं चांगलं काम करायचं असतं
अपमानाने कधी खचायचं नसतं
जिद्दीने बळ वाढवायचं असतं
नाराज मुळीच व्हायचं नसतं ||2||

चैतन्य सदा फुलवायचं असतं
पाय ओढेल म्हणून परतायचं नसतं
पुढे अन पुढे जायचं असतं
लोक निंदेला कधी घाबरायचं नसतं||3||

आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं
रागात कोणाला बोलायचं नसतं
प्रेमाने मन जिंकायचं असतं ||4||

जीवनात खूप करण्याजोगे असतं
आपलं फक्त तिकडे लक्ष नसतं ||5||

संग्रहित

संग्राम खोरे
एफ वाय बीसीए

# माय



लोकल गाडीच्या डब्यामध्ये, कोपऱ्यात कुठे उभी असतेस,
घामेजलेला चेहरा सारखा, पदराला त्या पुसत असतेस,

कधी दिसतेस तिठ्यावरती, किंवा चौकात रस्त्यावरती,
उन्हा तान्हात पिशव्या घेऊन, कुठेतरी जात असतेस.

आता असल्या या वयात, कशाला करतेस इतकी तडफफड ?
कोण सांगतं तुला इतकी कामं, उगीच बडबड करत असतेस.

तुला आता फारसं,काहीच काम उरत नाही,
वाती वळणं सोडून देऊन, विनाकारण राबवत असतेस?

कबूल आहे एकेकाळी, तुझा मोठा डौल होता,
आता उगीच पडक्या वाड्यात, भुतासारखी हिंडत असतेस.

कबूल आहे एकेकाळी, तुझे हिरवे शिवार होते,
आता सुपात घेऊन काही,फोलफाटं तेवढी पाखडंत असतेस.

कबूल आहे एकेकाळी, तुझा मोठा बारदाना होता,
आता मात्र गप गुमान, कोपऱ्यात चूल फुंकत असतेस,

आजच्या जगात माये तुला, कवडी इतकी किंमत नाही,
तरीही त्वेषात पदर खोचून, उगीच कशाला भांडत असतेस ?

हाडाडलेली तुझी काया, सांगत असते वेगळीच कहानी,
तरीही ओठातल्या ओठात तेव्हा, वेगळेच काही गुणगुणत असतेस.

आठवत असेल तुला कधी, मेन्यामधला प्रवास माये,
हळूच पडद्या आडून काही, उघडेवाघडे बघत असतेस,

काय आठवत असते तुला ? जुने पाने काहीतरी,
हसता हसता मधेच का मग, हळूच डोळे पुसत असतेस

सुरकतलेल्या हातांवरती, थकल्या भागल्या रेषा आहेत,
तरीही मनत्रयात आहेवपणाचा, हिरवा चुडा मिरवत असतेस,

कुणीही नसतं तुझ्यासोबत, तरीही कधी एकटी नसतेस
भाळावरचं ठसठशीत कुंकू, म्हणूनच का ग दाखवत असतेस ?

अस्तित्वाला तुझ्या तरीही, मायेचं घर नाही,
तरीही तुझ्या असलेपणात, नसलेपण सोसत असतेस.

खूप वाटते माये तुझ्या, लेकराले खूप काही सांगितलं तर
हसून शहाणी भाळावर, बोट ठेवत असतेस

– प्रा भानुदास दिवेकर (अर्थशास्त्र विभाग)



# अशोका

अशोक झाड हे पुष्प ताम्रपल्लव गंधपुष्प असा विविध नावांनी ओळखले जाणाऱ्या वृक्षाला मराठीत अशोका म्हणतात. तसेच शास्त्रीय भाषेत (saraca indica) असे संबोधतात. हे वृक्ष मुख्यतः दक्षिण आणि पूर्व भारतात तसेच श्रीलंकेत आढळतात. सीता मातेच्या सानिध्याने पवित्र झाल्यामुळे हिंदू धर्मा मध्ये या वृक्षाला महत्त्व दिले जाते. अशोका वृक्षाला फळाचे स्वरूपात चपट्या लांबट गोलाकार आकाराच्या शेंगा असतात .ही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. Polyalthia longfolia हे अशोक वृक्षाचे शास्त्रीय नाव आहे.

**उत्पत्ती स्थान :** अशोकाचे झाड मध्य आणि पूर्व हिमालय भारत व दक्षिण भारतात आढळतात.

**उपयोग:** झाडाच्या वाळलेल्या सालीत औषधी गुणधर्म आहेत. याच्या पानाचा काढा पिल्याने थकवा निघून जातो .महाकवी कालिदासाने ऋतू संहार या काव्यात खालील पंक्ती लिहिल्या आहेत.

'अमुला तो विद्रूमरागताम्र सपल्लव पुष्पचय द धन .....'



# पाईन

पाईनची बहुतेक झाड मोठे सदापर्णी वृक्ष असून काही झुडपेहि आहेत. वृक्षांचे खोड सुमारे २५-६० मिटर उंच आणि गोलाकार खांबाप्रमाणे सरळ असून त्यावर साधारण जाड खवल्यांनी सोलून जाणारी साल असते. नवीन लांब फांद्या दरवर्षी येतात पण त्या झाडाची शारीरिक वाढ सामान्यपणे फुलझाडांपैकी द्विदलीकीत गटातील वनस्पतीत आढळते . पाईनच्या काही जाती दीर्घकाळ जगतात या वृक्षाचा उपयोग कागदाचा लगदा, खोकी, आगपेटी छत इ. होतो. जंगली पशु पक्षांना अनेक वृक्षांच्या बिया खाद्य म्हणून वापरतात. पाईन वृक्ष सर्व प्रकारच्या वातावरणात टिकणारे वृक्ष आहे. या वृक्षाला शेंदरी शंकू येतात शोभेसाठी या वृक्षाची लागवड केली जाते.

pinus ponderosa हे पाईन वृक्षाचे शास्त्रीय नाव आहे .

- थोरात चैताली महादेव
F.Y.B.B.A (C.A)

# College life

College life हा सर्वाच्या आयुष्यातील अविस्मरणीय वर्षापैकी एक म्हणून ओळखले जात. हे जीवन शालेय जीवनापेक्षा पूर्णपणे वेगळे असते college life आपल्याला नवीन अनुभव आणि अशा गोष्टींशी परिचित करते ज्यांच्याशी - आपण पूर्वी परिचित नसतो .काहींसाठी, कॉलेज लाइफ म्हणजे आयुष्याचा पूर्ण आनंद लुटणे आणि पार्टी करणे, तर इतरांसाठी त्यांच्या करिअरबद्दल गंभीर होण्याची आणि उज्ज्वल भविष्यासाठी पूर्ण करण्याची वेळ आहे.

College life मध्ये अनुभव खरोखरच एक वेगळ्याच प्रकारचा असतो. सर्वाच्याच जीवनातील सर्वात अविस्मरनिय आठवण म्हणजे नक्कीच मित्र-मैत्रिणी सोबत : घालवलेला वेळ व त्यांच्या सोबत फिरणे मौज करणे.

माझा अनुभव अगदी असाच होता. first Year ला मी BSc. Computer Science ला admission घेतले सगळ्याच्याच प्रमाणे माझ्या मनात खूप भिती होती, बरेच प्रश्न सुधा होते, तसेच excitement पण खूप होती की आता Freedom पण खूप असणार, की आता आपले decision आपण स्वत: घेनार वगैरे......

College life सुरू होणारच होत की खूप मोठी महामारी आली ती म्हणजे कोरोना" या मूळे तर आमच्या सगळच्याच आयुष्यावर याचा परिणाम झाला, college आता offline नसून ते online होणार मग काय सगळी excitement गेली. College group बनवला गेला रोज त्यावर नोटीस येवू लागली. Online Lecture सुरू झाले. खरतर आमची पात्रता चीच परीक्षा होती ही, पहिल lecture सुरू झाले पण मॅडम /सर काय शिकवताय काय बोलताय काही समजेन .खूप Problem यायला लागले, मग online lecture मध्ये Network issue असेल तर मॅडम/सर चा आवाज येत नसेल.हे आता रोजचेच झाले होते. कुठ आम्ही serious होतो. Starting ला तर आता तो एक Masti. Platform झाला होता .मॅडम /सर आवाज येत नाही सर Screen च दिसतनाही हे आता रोजचेच कारणे झाले होते आमचे. सर/ मॅडम मात्र जीवतोडून शिकवायचे पण Student खूप प्रास द्यायचे ते पण चिडायचे मग आणि शेवटी lecture end. असे गेले आमचे दोन वर्षे lockdown मध्ये कोरोना महामारी मुळे education च खूपच नुकसान झाले. Exam पण online व्हायच्या ,आम्ही Google वरच answer शोधायचो... कधी पास होण मुश्किल होत त्यात आम्हाला online exam मध्ये out off मार्क्स मिळायचे. तो आनद पण काही वेगळाच होता.

Second Year च्या 1 semester ला college offline होणार अशी Notice group ला आल्यावर आम्ही मात्र खूपच खुश झालो.आता कॉलेज लाईफ जगता येणार आपल्या पद्धतीने .रोज कॉलेज ला येणं , सर्व प्रोग्राम असो, किंव्हा farewell पार्टी असो,आम्ही Participate करू लागलो ... मी तर कधी Anchoring केले नव्हती,पण try करण्याची इच्छा होती मग काय नाव दिले सरांकडे. TY ची फेअरवेल पार्टी करण्याचे काम पण सरांनी मलाच दिले.किती ती धावपळ, रुसवा-फुसवा ,आमच्या class ची Balloon फुगवायची धमाल ती decoration ची excitement असो ,की जेवनाचा Menu असो सगळं मी स्वतः Arrange केल त्यात मला आमच्या क्लास ने केलेली HELP आठवणीय आहे. कसबस farewell party ची arrangement झाली .दिवस आला तो farewell Party चा मनात माझ्या खूप भिती की आता Anchoring करायचं सगळ्यांच्या समोर .खूप भिती ,पाडळे सर ,जगताप मॅडम सगळ्यांनी च खूप मदत केली . पाडळे & quot ; सरांनी माझ्यावर जो विश्वास

दाखवला की निकिता तू करशील आणि खूप छान Anchoring करशील. खूप छान पद्धतीने Farewell Party पार पडली . हा पण आगळा-वेगळा अनुभव होता माझ्यासाठी.

College मध्ये होणाऱ्या स्पर्धा रांगोळी, Poster Presentation ; पदनाट्य असो मी सगळ्यात Participate करून पहिला नंबर पटकावला होतो .यात पण माझी help करणाऱ्या प्रीती मॅडम,मोरे मॅडम ,नागणे सर, waingade सर,आणि क्लासमेट .college life मध्ये ही पण खूप अविस्मरणीय आठवण आहे माझ्यासाठी . Canteen मध्ये होणारी Masti अशी की order करायची खाऊन झाले की बिल ला एकमेकांवर ढकलायचो किंवा चल Party दे तुझ्या Birthday ची किंव्हा न्यू फोन ची खुप सतवायचो एकमेकांना ,फुकट खायच मनलकी Party असायची कुणाकडून पण......मस्त असते ना एक Freedom एक नवीन जग, नवीन लोक, नवीन नाती पण एक गोष्ट तशीच रहाते ती म्हणजे कॉलेज आणि कॉलेज चा अभ्यास......

Canteen मध्ये एकत्र बसून घेतलेला सकाळचा cutting चहा, अचानक मारलेल Bunk lecture बुडवून साठवलेले खुप सारे आनंदाचे क्षन. Lecture चालू असताना मारलेला jock आणि पकडल्यावर एक - एकमेकांकडे बघून हसणं.... practical च्या वेळी केलेली मज्जा आणि Program च Copy Paste करण आम्हाला भारी जमायचं.. कधी computer निट बघितला नव्हता आता मात्र आम्ही स्वतः handle करायचो. जोडव्यापासून ते पूर्ण कॉम्प्युटर चालवण्यापर्यंत आम्ही या तीन वर्षात शिकलो. BCS मूळे एका वेगळ्याच जगाची आम्हाला ओळख झाली. परिक्षेच्या आदल्या दिवशी जागून केलेला, Study किंवा friends ला phone लावून विचारलेले I.M P. प्रश्न हे सगळ पेपरच्या आदल्या दिवशी आम्ही केलेले Planning .Lecture चालू असताना केलेले कांड आणि पकडल्यावर सगळ्यांना एकत्र मिळालेली शिक्षा .**आमच्या group बद्दल काय बोलायचं सगळ्यात वेगळा क्लास आणि क्लास मधले सगळे ते students college ला यायचा कधी पत्ता नाही दोघी - चौघी सोडल्यातर कॉलेज कधी कोणी दिसत सुद्धा नव्हत. म्हणून तर group च नाव पण तसं भारी ठेवलं Low attendance ...

Birthday ची party. असो किंवा New year celebration, masti आमची दमदार होती. Group तर आम्ही असे बनवले होते नावातच आमची पूर्ण history दिसत होती....कधी college ला present नसणारा ग्रुप आमचा लो attendance hota . कधी विचार न करता येणार! Group आमचा Discussion होता.

Philosophy मध्ये, तर आम्ही P.H.D च केली होती. कसे आमचे तीन वर्ष संपले काही कळेच नाही.

"गेले ते दिवस राहिल्या फक्त आठवणी"

आम्ही ठरवलेला गप्पा Point असा की , असं खूप कमी वेळा व्हायचं की शिक्षक पण आमच्या सोबत असायचे.अशे शिक्षक भेटायला पण खूप Luck लागतं ...मस्ती च्या सोबत Carrere guidance पण खूप छान मिळायच...आज आठवण आली त्या मित्र-मैत्रिणीची जे सुरुवतीपासूनच सोबत होते. मस्तीत पण आणि दुःखात पण ज्यांच्यासोबत भांडण पण होईची आणि थोड्या वेळाने Sorry बोलून परत एक पण होईचो..... मस्त होत यार सगळं ,कसलीच अपेक्षा नव्हती भेदभाव नव्हता college ने खूप काही शिकवलं एक माणूस म्हणून कस जगायच अनुभव दिले, मित्र-मैत्रिणी .... हे क्षण कधीच नाही विसरता येणार.

एक कट्टा आणि खूप साऱ्या गप्पा.......

Writer by-

**Nikita Rajendra Jagtap**

# जागतिक तापमानवाढ व त्याचे परिणाम

मानव हा त्याच्या बुद्धी कौशल्यामुळे प्रगत बनला. त्याने त्याच्या सुखासाठी अनेक सुखवस्तू निर्माण करून आपले जीवन सुखी बनवीले. तो आनंदाने काही क्षण जगला. पण हा आनंद त्याला खूप काळ लुटता येऊ शकला नाही आणि येथून पुढेही लुटता येणार नाही. त्याचे कारण एकच आहे, मानवाने नव प्रगती तर साधली परंतु त्यामुळे होणाऱ्या परिणामांचा विचार केला नाही, हा पुढचा विचार करण्याची पद्धत नसणारा मानव फक्त आणि फक्त त्याच्या या वृत्तीमुळे आज या जागतिक तापमान संकटात सापडला आहे. एक प्रकारे मानवाचे जीवनच धोक्यात आले आहे. मानवाने अशा काही वस्तूंचा शोध लावला व अशा काही वस्तू निर्माण केल्या, की त्या त्याला स्वतःलाही नष्ट करता येऊ शकत उदा. प्लास्टीक मानवाने कमी तापमानात वाढणारी व अधिक फायदा देणारी वृक्षांच्या लागवडीसाठी हरित गृहांचा शोध लावला यावेळी मानवाचा स्वार्थीपणा त्याच्या विनाशाला कारणीभूत ठरला. हरितगृहामध्ये सूर्याची उष्णता तर शोषली जाते, परंतु ती परत हवेत जाऊ शकत नाही. त्यामुळे पृथ्वीचे तापमान मोठ्या प्रमाणात वाढण्यास मोठा हातभार लागत आहे.

मानवापुढे एक सर्वात मोठा प्रश्न आहे तो म्हणजे ध्रुवावर वितळणाऱ्या बर्फाचा. एकीकडे सूर्याचे आग ओकणे चालू तर दुसरीकडे मानवांच्या कृतीमुळे तापमान वाढणे चालू. या सर्व गोष्टींमुळे ध्रुवांवरचा बर्फ वितळण्याची गती वाढली आहे. शास्त्रज्ञांच्या मते, पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवांवर एवढा बर्फ आहे की तो जर वितळला तर जगबुडीला कोणीसुद्धा वाचवू शकणार नाही. त्यातच काही शास्त्रज्ञांच्या मते पृथ्वीचे तापमान सुमारे ३ अंश सेल्सीयस ने वाढले आहे. त्यामुळे आणि ही तापमान वाढ जर अशीच चालू राहिली तर येत्या काही वर्षात समुद्राची पातळी सुमारे ३० ते ४० सें.मी. ने वाढेल, असे काही शास्त्रज्ञांचे मत आहे. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील लोकांची घरे व शेती पाण्याखाली जाईल व लाखो लोक बेघर होतील. त्यांच्यासाठी जागेची टंचाई निर्माण होईल, तसेच लाखो हेक्टर सुपिक जमीन नापिक व खारफुटी बनेल.

तापमान वाढीचा त्सुनामी हा परीणाम तर तुम्हाला माहितच असेल. सन २००६ मध्ये इंडोनेशिया येथील समुद्रात झालेल्या भूकंपामुळे त्सुनामी आली. त्यामुळे भारतातील तसेच श्रीलंका, इंडोनेशीया, म्यानमार तसेच इतर काही बेटांवरील सुमारे ३ लाख लोकांना आपले प्राण गमवावे लागले, वा त्सुनामीमुळे हेक्टर जमीन नापिक झाली तसेच हजारो कोटींची वित्तहानी देखील झाली. जागतिक तापमान वाढीचे नुकतेच घडून आलेले उदाहरण म्हणजे, अमरनाथचे शिवलिंग वाढत्या तापमानामुळे वितळले. त्यामुळे भाविकांना या शिवलिंगाचे दर्शन झाले नाही. तसेच लोकांच्या कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले.

याशिवाय जागतिक तापमान वाढीत भर घालणारे घटक म्हणजे वहाने व वृक्षतोड. वाहनातून निघणाऱ्या धुरामुळे वातावरणात कार्बन व इतर काही पदार्थाचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त वाढून वातावरणात से तसेच शिल्लक राहतात, त्यामुळे हवेचे तापमान वाढते.

वृक्षतोडीमुळे हवेतील कार्बनडाय ऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे व त्यामुळे हवेचे तापमान वाढण्यास हातभार लागत आहे. वृक्षांच्या तोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले. तसेच पाऊसही अनिश्चित स्वरूपाचा बनला आहे. मागच्या वर्षी तर राजस्थानसारख्या वाळवंटी भागात अतिवृष्टी झाली, तर आसामत दुष्काळ पडला होता. महाराष्ट्रात तर दरवर्षीपेक्षा पावसाचे प्रमाण खूप कमी होते. त्यामुळे विशेषतः शेतकरी फार संतप्त झाला, कर्जबाजारी झाला. त्याच्यावर आत्महत्येची वेळ आली. हे सर्व सरकारमुळे घडले असे नव्हे तर या सर्व गोष्टींना मानव स्वतः कारणीभूत आहे.

वाढती लोकसंख्या सुद्धा जागतिक तापमान वाढीला अप्रत्यक्षपणे भर घालत आहे. कारण जेवढी लोकसंख्या जास्त तेवढी जास्त वाहने, सुख सोयी व या सुख सोयी निर्माण करण्यासाठी कारखाने आलेच व कारखाने आले की प्रदूषण वाढवणारा एक राक्षस आला असे म्हणावे लागेल. कारण कारखाना एक नव्हे तर चार - चार प्रदूषणाला कारणीभूत ठरतो. उदा. जल, वायू, ध्वनी व किरणोत्सारी प्रदूषण यामुळे कारखाने तापमान वाढीत भर घालतात. तसेच एवढ्या मोठ्या लोकसंख्येला राहण्यासाठी जागा तर हवीच. मग पुन्हा त्याच्यासाठी वृक्षतोड आलीच.

म्हणून अशाप्रकारे आपण आपल्या स्वतःचे सुख मर्यादित ठेवून, स्वार्थीपणा सोडून जगाचा विचार करण्यास सुरुवात केली तसेच वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली, वाहनातून तसेच कारखान्यातून निघणाऱ्या प्रदूषकांवर नियंत्रण ठेवले, तसेच वृक्षतोडीवर कडक बंधने घातली तर तापमान वाढीस काही प्रमाणात आळा घालता येईल. नाहीतर परिणाम आपल्याला ठाऊकच आहेत.

-रोहन गवळी (टी.वाय.बी.ए. इतिहास)

# आयुष्यातलं यश-अपयश

आयुष्यात सगळयांना असं वाटतं की, आपण मोठं झाल्यावर काहीतरी बनाव.आपण पाहिलेलं स्वप्न आपण पूर्ण करावं किंवा आपल्या आई-वडिलांनी आपल्यासाठी पाहिलेलं स्वप्न आपण पूर्ण करावं. असं प्रत्येकाला वाटतं आपल्या स्वप्न पूर्ण व्हावं यासाठी आपले आई-वडील दिवस-रात्र काम करत असतात दिवसभर शेतामध्ये राब राबता. त्यांना असं वाटतं की,आपल्या मुला-मुलींनी काहीतरी करावं, त्यांनी त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहावं.असं त्यांना नेहमी वाटतं आणि ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण केलेला प्रयत्न, आपण केलेली मेहनत कधी कधी एका वेगळया दिशेला मिळते. त्यामध्ये असतं यश आणि अपयश

आपण पाहिलेलं जे स्वप्न आहे ते पूर्ण करण्यासाठी आपण जितका प्रयत्न करतो ना, तितकाच त्या प्रयत्नात अनेक अडथळे येत असतात आणि त्याच अडथळयांना आपल्याला सामोरे जायचं आहे. त्या अडथळयातून नवीन मार्ग शोधावा लागतो आणि त्या अडथळयातून मार्ग कसा शोधायचा याचा मार्गदर्शन आपण आपल्या आई-वडिलांकडून असो, किंवा आपल्या शिक्षकांकडून असो, किंवा आपले बहीण भाऊ ,मित्र मैत्रिणी यांच्या कडून घ्यायचा नक्कीच ते आपल्याला मार्ग दाखवतील.

अपयश आलं तर खचून जाऊ नका ,त्या अपयशातून अजून काहीतरी नवीन शिका आणि पुन्हा नवीन सुरुवात करा, नक्कीच आपल्याला यश मिळेल. असं म्हणतात पहा की, जर आपण यशाचा दरवाजा पहिल्यांदा ठोकला तर ते आपल्याला मिळत नाही ,दुसऱ्यांदा ठोकला तर तरी सुद्धा आपल्याला मिळत नाही ,पण जर आपण तिसऱ्यांदा यशाचा दरवाजा ठोकला ना तर नक्कीच आपल्याला यश मिळेल.

कधी कधी असं होतं की आपल्याला अपयश, आणखी आपण खचून जातो पण तेव्हा खचून न जाता पुन्हा सुरुवात करायची, पुन्हा त्याच जोशात आणि त्याच प्रयत्नात आपलं काम चालू ठेवायचं मला कोणीतरी म्हणलंय पहा की अपयश ही यशाची पहिली पायरी असते ,कधीच हार मानायची नसते जी गोष्ट आपल्याला करायची आहे ना तीच गोष्ट आपल्या डोळयांना दिसली पाहिजे ,रात्री झोपेत सुद्धा जे काही आपल्याला करायचं आहे ना त्याला आपला 100% देण्याचा प्रयत्न करायचा कधीच हार मानायची नाही .

आयुष्यात यश अपयश हे चालूच असतं काही जणांना यश हे लवकर मिळतं, तर काहीजणांना उशिरा मिळतं, पण तुम्ही तुमचा प्रयत्न सोडू नका, हार मानू नका, नक्कीच तुम्हाला तुमच्या कार्यामध्ये यश मिळेल. पण एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की जर आपण आपल्या आयुष्यात काहीतरी केलं किंवा आपण आपल्या आयुष्यात काहीतरी बनलो ना तर माणसं आपल्याला विचारतात ,पण जर आपण आपल्या आयुष्यात काहीच नाही केलं तर, माणसे आपल्याला जवळून काय लांबून पण विचारत नाही.

स्वलिखित -
ढवळे सुषमा विश्वनाथ S.Y.B.A



# आई

' आई ' हा एक शब्द ऐकल्यावर मनामध्ये एक सुंदर अशी मूर्ती तयार होते आणि त्यामध्ये प्रेम , आपुलकी, ममता, दया, माया अशा अनेक भावना निर्माण होतात. ती मूर्ती जणू एक ममतेच मोठ सागरच तिच्यात जर एक डुबकी घेतली तर आपल्याला ममताच ममता मिळेल, मग डुबकी घेणारा चांगला असो किंवा वाईट तिच्यासाठी सगळे लाडके असतात आणि ती तिच्या सगळ्या मुलांना जीवापलीकडे प्रेम करत असते.

म्हणतात ना "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" खरच ना आई या शब्दात जेवढी ताकत आणि प्रेम आहे ते आपल्याला दुसरिकडे कोठेही मिळणार नाही. म्हणून स्वामी तिन्ही जगाचा मालक असून त्याला आईविना भिकारी मानला जातो .माणसाला सुखात आणि दुःखात साथ देणारी तसेच आपल्याला प्रेम आपुलकीची गरज असते, त्यासाठी देव बाप्पा प्रत्येकाकडे उपस्थित राहू शकत नाही म्हणून त्याने सर्वांना आई ही महात्मा दिली. तिच्या मुलांना पावला-पावलावर साथ देथे आणि त्यांना जीवा पलीकडे प्रेम करते.

- गांगुर्डे अश्विनी
एफवाय बी कॉम

# माड

माड किंवा श्रीफळ शास्त्रीय नाव (Cocos Nucifera) या विषुववृत्तीय व उष्ण कटिबंधीय मुखत्वे समुद्रकिनारे आणि लगतच्या भागात वाढणारा ताड कुळातील एक वृक्ष आहे. हिंदू सह आशियातील श्रद्धावान नारळ हे फळ पवित्र मानतात .त्याला धार्मिक कार्यात वापरताना श्रीफळ म्हणतात. नारळाचा सगळयात जास्त बापर मंदिरामध्ये केला जातो .दिवाळी ,दसरा, गणपती ,पूजा या दिवशी नारळाचा बापर करतात. मेंदूची क्षमता वाढवण्यास मदत मिळते. नारळामध्ये ब्रेन बुस्टिंग गुणधर्म आढळतात. जे पौष्टिक तत्व तुमचा मेंदूच्या सेल्सला सक्रिय करतात त्यामुळे तुमचा मेंदू अधिक चांगल्या पद्धतीने कार्य करायला लागतो. स्मृती व बुद्धी तलक होते आणि मेंदूची क्षमता वाढवण्यास मदत होते. या वृक्षाला इच्छापूर्ती वृक्ष असेही म्हणतात कारण याच्या सर्व अंगांचा उपयोग करता येतो .

# कडूनिंब

हा वृक्ष भारतीय उपखंडातील पाकिस्तान, भारत ,नेपाळ व बांगलादेश या देशात आढळणारा एक वृक्ष आहे. शास्त्रीय नाव (Azadirachta indica) हे आहे. या वृक्षाची पाने कडू असल्याने कडुलिंब म्हटले जाते. या झाडामुळे प्रदूषण होत नाही. कडुनिंबाची झाडे जिथे जास्त प्रमाणात असतात तेथील हवा सुद्धा राहते. या झाडाच्या फळांचा रस काढून त्याचा बापर तेल काढण्यासाठी केला जातो. या तेलाचा उपयोग सांधेदुखी कमी होण्यासाठी करतात.

धार्मिक महत्त्व:
मराठी वर्षाची सुरुवात चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे 'गुढीपाडवा' या दिवशी होते .त्या दिवशी गुढी उभारताना कडुलिंबाच्या झाडाची डहाळी बापरतात .हिंदूंचे नवीन शालिवाहन वर्ष गुढीपाडव्यापासून सुरू होते. चैत्र महिन्यात वृक्षांना नवीन पालवी फुटते. आपले नवीन वर्ष आरोग्यपूर्ण रहावे, म्हणून आपल्या पूर्वजांनी पाडव्याला कडुलिंबाचे सेवन सांगितले आहे .कडुनिंबाच्या काडीने दात घासल्यास दात किडत नाहीत.

# प्रामाणिकपणाचे फळ

एका गावात एक लाकूडतोड्या राहत होता. एके दिवशी तो दुपारी लाकूड तोडण्यासाठी नदीजवळ गेला .एक मोठे झाड होते. तेथे गेला झाड तोडत असतानाच त्याची कुऱ्हाड अचानक पाण्यात पडते .लाकूडतोड्याकडे एकच कुऱ्हाड असते आणि तीच कुऱ्हाड गमावतो. त्याच्याजवळ दुसरी कुऱ्हाड विकत घेण्यासाठी पुरेसे पैसे नसता.त तो नदी जवळ बसतो आणि रडू लागतो. नदीची देवी त्याचे रडणे ऐकते ती त्याच्यासमोर प्रकट होते आणि विचारते' का रे रडत आहेस?' तो लाकूडतोड्या नदीच्या देवीला गमवलेल्या कुऱ्हाडीबद्दल सांगतो. नदीदेवी अदृश्य होते नदीतून परत येते तेव्हा तिच्या हातात सोन्याची कुऱ्हाड असते ती लाकूडतोड्याला दाखवते. लाकूडतोड्या नम्रपणे म्हणतो ही कुऱ्हाड माझी नाही मग देवी त्याला चांदीची कुऱ्हाड दाखवते तो परत म्हणतो ही देखील माझी कुऱ्हाड नाही नंतर देवी त्याला लोखंडाची कुऱ्हाड दाखवते. लाकूडतोड्या म्हणतो हीच माझी कुऱ्हाड आहे. देवी म्हणते तुझा प्रामाणिकपणा मला आवडला, या तीनही कुऱ्हाडी तुला ठेव. प्रामाणिकपणा जीवनात मोठे बक्षीस मिळवून देतो.

तात्पर्य : नेहमी खरे बोलावे, प्रामाणिकपणा हाच खरा गुण आहे .

# पिंपळ

पिंपळ हे भारतीय उपखंडातील वृक्ष आहे .हा वृक्ष भिंतीवर, खडकावर, छपरावर ,खांबावर जिथे जागा मिळेल तेथे वाढतो .'वट' कुळातील हा वृक्ष आहे. वनस्पतीशास्त्रातील नाव (Ficus Religiosa) आहे .पिंपळाची उंची दहा ते पंधरा मीटर पर्यंत वाढते . खोड पांढरट गुलाबी लाल गुळगुळीत तंतुमय असते .पाने हृदयकार असतात. पुष्पाशय सुरुवातीला हिरवा व नंतर जांभळा होतो. लहान नळीचा आकाराची असतात, ही पिकलेली फळे पक्षांना फार आवडतात .हा वृक्ष भोवतालचे वातावरण शुद्ध करतो त्यामुळे याला पवित्र ठरविले असावे. पिंपळाच्या झाडापासून लाख बनवितात. याच्या औषधाने व्रण बरे करतात. पिंपळाच्या फळाच्या झाडाला धार्मिक महत्त्व आहे. या झाडाची सावली फार थंड असते. हा वृक्ष चोवीस तास हवेत ऑक्सिजन सोडतो .हा वृक्ष मोकळे जागेत सहज वाढतो म्हणून याची लागवड मोकळया जागेत करावी.

थोरात चैताली महादेव
F.Y.B.B.A (C.A)

# सदाचार

महाभारतकालीन राजा सत्यदेव एक दिवस सकाळी उठले, तर त्यांना एक सुंदर स्त्री राजवाड्यातून बाहेर पडताना दिसली. राजाने आश्चर्यचकित होऊन त्या स्त्रीला हात जोडून नम्रपणे विचारले ,आपण कोण आहात? त्यावर स्त्री म्हणाली "मी लक्ष्मी असून मी राजवाड्यातून जात आहे", हे ऐकून राजा म्हणाला 'बरं तू जाऊ शकतेस' लक्ष्मी बाहेर पडली. नंतर लक्ष्मी पाठोपाठ एक सुंदर राजपुरुष राजवाडे बाहेर पडताना पाहून राजाने त्याला विचारले 'आपण कोण आहात 'त्याने उत्तर दिले "माझे नाव दान आहे लक्ष्मी बाहेर गेल्यानंतर आपण दान करू शकत नाही म्हणून मी पण तिच्याबरोबर जात आहे" यावर राजा म्हणाला ठीक आहे आपणही राजवाडा सोडून जाऊ शकता .त्यानंतर त्याच्या पाठोपाठ तिसरा पुरुष यश ही तिथून निघून गेला. त्यानंतर चौथा पुरुष प्रकट झाला तोही बाहेर पडू लागला तेव्हा राजाने हात जोडून विचारले' तुमचे नाव काय?' तेव्हा तो पुरुष म्हणाला माझे नाव "सदाचार" यावर राजा म्हणाला मी तर तुझा त्याग कधीच केला नव्हता, तू मला सोडून जात आहेस तुझ्यासाठी लक्ष्मी, दान ,यश आदींचा. त्याग केला मी तुला जाऊ देणार नाही. तू मला सोडून गेला तर माझे सर्वस्व संपून जाईल राजाचे हे बोलणे ऐकून सदाचार राजवाड्यातच थांबला. सदाचार बाहेर पडला नाही म्हणून लक्ष्मी, दान, यशही परत आले .

तात्पर्य: सदाचाराने वागणे हेच आयुष्याचे सर्वस्व आहे जर सदाचार नसेल तर दान, लक्ष्मी ,यश यांचा काहीच उपयोग नाही.

# समाज प्रबोधनाचे माध्यम किर्तन

आजकालच्या युगात कीर्तन हे समाजप्रबोधनाचे खूप मोठे माध्यम आहे .म्हणून म्हटलं जातं...

नाचू कीर्तनाचे रंगी
ज्ञानदीप लावू जगी||

आज खरं तर प्रत्येक तरुण व तरुणीने आज साधुसंतांनी जी शिकवण दिली आहे ,त्याचबरोबर साधू संतांचे आचार विचार, आत्मसात करायला पाहिजे. आज खरं तर त्यांच्या विचारांवर चालण्याची गरज आहे .कीर्तनामुळे आपल्यामध्ये नक्कीच खूप मोठा बदल होतो. बऱ्याच वेळा आपण खचतो. आपल्या आयुष्यात अनेक मोठ्या अडचणी येतात , आणि त्या अडचणी आपल्याला खूप मोठ्या वाटू लागतात. पण त्या अडचणींमधून बाहेर पडायचं असेल तर आपण किर्तन जरी ऐकलं ना तरी आपल्यामध्ये खूप मोठा बदल होतो .आपल्याला प्रसन्न वाटते. कीर्तनाच्या माध्यमातून आपण नक्की समाज प्रबोधन करू शकतो . या समाजप्रबोधनातून लोकांपर्यंत संत तुकाराम महाराज. संत ज्ञानेश्वर महाराज .संत एकनाथ महाराज इत्यादी साधू संतांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवून ते त्यांच्या जीवनामध्ये आत्मसात करायला लावू. बरीच लोक असतात त्यांना कीर्तन म्हटलं की खूप आनंद होतो. खर तर व्हायलाच पाहिजे | कारण किर्तन हे एक खूप महत्त्वाचं माध्यम बनलं आहे. बरेच लोक डिप्रेशन मध्ये जातात तेव्हा त्यांना नवीन दिशा देण्यासाठी कीर्तन हे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामधून लोकांपर्यंत चांगला संदेश पोहोचवू शकतो. 'तू खचू नको ,तू फक्त पुढे चाल, तू प्रयत्न करण सोडू नको, तू प्रयत्न कर, तुला पाहिजे ते मिळणारच, तू फक्त तुझे प्रयत्न प्रमाणिक ठेव ,मग तुला कोणीच थांबवू शकणार नाही.' कारण कर्ता आणि करविता फक्त तो देवच आहे, तू फक्त चांगलं वागणं सोडू नको या कीर्तनाच्या माध्यमातून आपण लोकांपर्यंत समाजापर्यंत अनेक संदेश पोहोचवू शकतो, जसं की जीवनात आल्याच्या नंतर पाच गोष्टी कधीच विसरू नका.

1. एक धर्माला कलंक लागेल असं कधी वागू नका.
2. माय बापाला कधीच विसरू नका.
3. व्यसनाच्या आहारी कधी जाऊ नका.
4. नीती सोडून कधी पैसा कमवू नका.
5. ज्याने हे सगळं दिलं त्या माझ्या पांडुरंग परमात्म्याला कधीच विसरू नका.

अशा प्रकारचे संदेश आपण लोकांपर्यंत कीर्तनाच्या माध्यमातून पोहोचवू शकतो .आजकाल तरुण वर्ग या कीर्तनाकडे वळत आहे. त्याचबरोबर बाल कीर्तनकार मुली सुद्धा कीर्तनामध्ये आपल्याला पुढे येताना दिसत आहेत .आत्ताच्या काळात आपली संस्कृती आणि धर्म हा कीर्तनाच्या माध्यमातून नक्कीच जपला जात आहे

थोरात चैताली महादेव
F.Y.B.B.A (C.A)

# स्त्री

विधात्याने निर्माण केलेल्या सृष्टीतील अनमोल रत्न व जगात क्षमा आणि शांती यांचा मूलमंत्र सांगणारी, भविष्याला फुलविणारी, आणि गतकाळाला झुलवणारी स्त्री आहे. असे असूनही स्रीयांवरच निर्बंध का लादले जातात. मानवी जीवनामध्ये स्त्रियांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. तिचा जन्म होताच ती असंख्य नात्यांमध्ये बांधली जाते. कधी मुलगी म्हणून, कधी पत्नी म्हणून, कधी सून म्हणून, कधी सासू म्हणून, तर कधी आई म्हणून अशा वेगवेगळया भूमिकेतून आपले जीवन तिला व्यथीत करावे लागते. स्री देखिल एक माणूस आहे तिलाही इतरांप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे. तिला या नात्यांमध्ये अडकवून कुटुंबात दुय्यम स्थान दिले जाते. लहानपणी आईवडिलांच्या, तरुणपणी पतीच्या आणि म्हातारपणी मुलांच्या छायेत आपले आयुष्य घालवावे लागते. एका बाजूला ती गगन भरारी घेताना ती तिच्या जबाबदाऱ्या देखील पार पडताना दिसते तरीही स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान दिले जाते . तिला स्वत: बद्दलचा देखिल एखादा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. तिचे जीवन चूल आणि मुल एवढेच मर्यादित केलेले दिसून येते.

पूर्वीच्या काळाचा जर आपण विचार केला तर असे दिसून येते की वैदिक काळात स्त्रियांना मानाचे असे स्थान होते. त्याकाळी कोणत्याही कामाची सुरुवात करताना स्त्रियांच्या हातून केली जायची स्त्रियांना देवी समान व उच्च मानत असायचे त्याकाळी मुलीच्या जन्माचे स्वागत मोठ्या उत्साहात आनंदात केले जात असे. ज्या घरी मुलगी जन्माला यायची त्या घरी साक्षात लक्ष्मीच अवतरली आहे असे वाटत होते. वैदिक काळात गार्गी मैत्रेयी सारख्या विद्वान पंडित स्त्रिया होऊन गेल्या, त्याचबरोबर त्याकाळी नालंदा तक्षशिला सारखी विद्यापीठे देखील होती. म्हणजे त्याकाळी स्त्रियांना मानाचे स्थान तर होते परंतु त्याचबरोबर त्यांना शिक्षणाचा देखील अधिकार होता नंतर १८ व्या १९ व्या शतकापर्यंतचा इतिहास जर बघितला तर काही घटना, प्रसंग, चालीरीती, रूढी परंपरा स्री स्वातंत्र्यासाठी फारच प्रतिकूल ठरत गेल्या व चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होत गेले.

१९ व्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक विचारांची क्रांती झाली आणि स्त्री शिक्षणाचा विचार सुरू झाला त्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, विष्णुशास्त्री पंडित आगरकर यांसारख्या समाजसुधारकांच्या अंतकरणात स्त्रियांच्या बाबतीत करुणा जागृत झाली. स्त्रियांच्या उद्धारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य पणाला लावले. तेव्हापासून त्यांच्या प्रयत्नांना हळूहळू यश येऊ लागले. स्रीया शाळेत जाऊ लागल्या, शिक्षण घेऊ लागल्या, आपल्या पायावर उभ्या राहिल्या काळ पुढे पुढे धावत होता त्याबरोबर स्त्री सुद्धा धावत होती. विचाराने आणि आचाराने सुद्धा भारतीय समाजामध्ये सतीची प्रथा राजा राम मोहन राय यांच्या प्रयत्नामुळे बंद झाली. स्त्रियांच्या अधोगतीला जेवढा धर्म, समाज आणि इथली व्यवस्था कारणीभूत आहे. तेवढेच स्त्रियांचे अज्ञान, अशिक्षितपणा कारणीभूत आहे. हे फुले-शाहू-आंबेडकर तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ओळखले होते. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी" असे महात्मा फुले म्हणाले परंतु पुरुषप्रधान संस्कृतीने मात्र स्त्री च्या हाती केवळ पाळण्याचीच दोरी रहावी आणि पाळणा सतत हलतच राहावा यासाठी ही व्यवस्था निर्माण केली. यासाठीच स्त्रियांचा जन्म आहे असे म्हणून स्त्रीच्या प्रगतीचा विचार त्या ठिकाणी पूर्णपणे नाकारला.

शिक्षणाने स्त्रियांची हळूहळू प्रगती झाली त्यांचे अज्ञान दूर झाले प्रत्येक अडचणी मधून ती स्वत: मार्ग काढू लागली आणि आज प्रत्येक क्षेत्रामध्ये उजळमाथ्याने आणि निर्भीडपणे स्वत:च कार्यक्षेत्र मिळवू लागली. तिचा स्वाभिमान शिक्षणामुळेच जागा झाला. विदुषी स्त्री, मिळवती स्त्री, विधवा असून सन्मानाने वावरणारी स्त्री, स्त्री-पुरुष समुदायात सहजपणे वावरणारी स्त्री, सभा संमेलनात आवेशाने भाषण करणारी स्त्री, एकटीने जगभर प्रवास करणारी स्त्री, आपले निर्णय आपण घेऊ ते स्वत:च्या बळावर अमलात आणणारी स्त्री, संस्था प्रमुख स्त्री, सरपंच ते राष्ट्रपती पदावर विराजमान होऊन राजकारणात रस घेणारी स्त्री अशी स्वतंत्र स्त्रियांची कितीतरी रूपे आज आपल्याला प्रत्येक क्षेत्रात आढळत आहेत.

आज स्त्रिया उजळमाथ्याने वावरताना दिसत आहेत. परंतु, काही विकृत लोक मात्र अजूनही तिच्यावर अन्याय अत्याचार करत आहेत. एखाद्या स्त्रीवर बलात्कार झाला म्हणजे तिच्यावर अन्याय झाला असे नाही किंवा तिने गगन भरारी घेतली म्हणजेच तिची प्रगती झाली असेही नाही तर या दोन गोष्टींमधली जी काही परिस्थिती आहे ही परिस्थिती देखील आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. म्हणूनच कोणीतरी आपला विचार करावा आपल्या अडचणींवर मार्ग काढावा या अपेक्षेमधून आता स्त्रियांनाच बाहेर येणे खूप गरजेचे आहे. आज स्त्री जरी मुक्तपणे विहार करत असेल किंवा तिला प्रत्येक क्षेत्रात समान संधी जरी असेल तरी स्त्रीनेच स्त्रीला महत्व दिले पाहिजे. स्त्रीनेच स्त्री जन्माचे स्वागत केले पाहिजे आजच्या काळातील स्त्रियांच्या स्थितीचा विचार केला तर फारसा बदल झालेला दिसत नाही. आजही मुलगा मुलगी असा भेद करून मुलगी झाल्यास स्त्रियाच डोळयातून पाणी काढतात या मानसिकतेच्या मूळ कारणांचा स्त्रियांनीच शोध घ्यायला हवा स्त्रियांनीच स्त्रियांचे प्रश्न मांडायला हवेत आणि स्त्रियांनीच स्त्रियांचे प्रश्न सोडवायला हवेत या लेखाच्या माध्यमातून एवढीच माफक अपेक्षा स्त्रियांकडून करावीशी वाटते.

स्वलिखित
सहा. प्रा.सुरेखा विठ्ठल देशमुख

# स्त्री : आधुनिकत्व काळाची गरज

आजच्या युगात प्रत्येक मुलीने, स्त्रीने आपल्या पायावर उभे राहणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या पायावर उभे राहून कर्तुत्व गाजवणे काळाची गरज बनली आहे. बऱ्याच मुली मला गरज नाही म्हणून अभ्यासाचा किंवा कामाचा कंटाळा करत असतात, पण माझे असे मत आहे की जरी आता गरज नसली तरी सर्व गोष्टी शिकून घेतल्या पाहिजे. मुलगी, स्त्री सर्व गोष्टींमध्ये परांगत असली पाहिजे .सर्व परिस्थितीला हाताळता आली पाहिजे. मुलींनी इंस्टाग्राम सोशल मीडियावर आपला वेळ खर्च करण्यापेक्षा नवीन-नवीन स्किल शिकण्यासाठी आपला वेळ खर्च करावा .कोणतेच काम हे छोटे-मोठे नसते काम हे काम असतं .आपल्याच वयाची मुलं लहान सुरुवात करून आज मोठ्या पदावर जात आहे, स्वतःच्या पायावर उभे आहेत ते बाहेर जाऊ स्वतःच्या पोटापुरते पैसे तरी कमवू शकता पण ते मुलींना जमत नाही, कारण मुलींना छोटी सुरुवात नको असते.

दरवर्षी दहावी बारावीचा रिझल्ट पाहिला की आपल्याला हे लक्षात येते की सगळीकडे मुलीच नंबर आणत आहे .मग आणखी पाच सात वर्षांनी या मुली जातात तरी कुठे? शंभरातील खूप झाले तर सात ते आठ मुली कुठेतरी आपल्या पायावर उभे असतात आणि बाकीच्या मुलीकडे आम्हाला फ्रीडम नाही, आमची सोय नव्हती, आमची  घरची परिस्थिती नव्हती, चांगले स्थळ आले होते, म्हणून जमून  टाकले अशी कारणे असतात ही कारणे देणे बंद करा.कारणे देऊन तुम्ही स्वतःची फसवणूक करत आहात हे होऊच शकत नाही, हे मी करू शकत नाही असे म्हणणे बंद करा. तुमच्याकडे दहावीनंतर पाच किंवा तीन-चार वर्ष तुम्हाला सिद्ध करण्यासाठी असतात. त्या वेळेचा वापर करून तुम्ही अशा काही गोष्टी शिका की त्या तुम्हाला भविष्यात जर वेळ आली तर तुम्हाला तुमच्या पायावर उभे राहता येईल छोट्या छोट्या गोष्टी शिकायला सुरुवात करा आणि त्यात सर्वोत्तम बना .जे आवडतं ते करा सर्व गोष्टी आल्याच पाहिजे म्हणून शिका जे तुमचं स्वप्न आहे त्याला करिअर बनवा आणि बाकीच्या गोष्टींचे आवड म्हणून शिका स्वतःचा पायावर उभे राहून जगण्याची जी  मजा आहे ती तर कोणत्याच गोष्टीत नाही.

तुम्हाला तुमचे संरक्षण सुद्धा करता आले पाहिजे म्हणून कराटे ,मुष्टियुद्ध शिका ,स्वतःला मजबूत बनवा. तुम्हाला कोणाला मदत मागण्याची गरज नाही आणि वेळ आल्यावर तुमची मदत कोणी करणार देखील नाही .कोणाचा गोड शब्दात बसू नका तुम्ही तुमचे व्यक्तिमत्व कसे सुधाराला याकडे लक्ष द्या .जगाचा जास्त विचार करू नका जग तुम्हाला तसेच जगू देणार नाही .तुम्ही स्वतःला सक्षम बनविण्यात वेळ खर्च करा तुम्ही जे पैसे ,मेहनत व वेळ नवीन गोष्टी शिकवण्यात खर्च कराल त्यापेक्षा जास्त पैसे त्या गोष्टी तुम्हाला तुमच्या आयुष्यात देऊन जाईल लोकांनी तुम्हाला तुमच्या वडिलांचा किंवा पतीच्या नावाने नाही तर तुमच्या स्वतःच्या नावाने ओळखले पाहिजे .समाजात तुमची चांगली ओळख निर्माण करता आले पाहिजे फक्त दिसण्यानेच नव्हे तर कामाने, कर्तुत्वाने विचाराने सुंदर व्हा.

अश्विनी जगदाळे (प्रथम वर्ष वाणिज्य)

# विद्यार्थी विकास मंडळ

वार्षिक अहवाल सन २०२२-२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळांतर्गत महाविद्यालयास विद्यापीठाने मान्यता दिलेल्या विविध योजना व उपक्रमांच्या अंमलबजावणीस महाविद्यालय नेहमीच आघाडीवर असते. चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थी विकास मंडळाच्या पुढील उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रवीण कुरुमकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे करण्यात आले.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

2) निर्भय कन्या अभियान

1) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिकाय योजना- आपल्या महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळांतर्गत आर्थिकदृष्ट्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याकरिता कमवा व शिका योजना राबविली जाते. चालू शैक्षणिक वर्षात एकूण 21 विद्यार्थ्यांना या योजनेत समाविष्ट करून घेण्यात आले होते. त्यापैकी 7 मुली व 14 मुले आहेत. योजनेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील कार्यालय, ग्रंथालय, हॉस्टेल, संगणक प्रयोगशाळा इत्यादी ठिकाणी सुट्टीचे दिवस सोडून महाविद्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत कामे दिली जातात.

चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामार्फत या योजनेवर एकूण 104130 रु (एक लाख चार हजार एकशे तीस रुपये) खर्च करण्यात आला आहे. अशाप्रकारे "कमवा व शिका" योजनेचा अनेक गरीब व गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ होत आहे.

2) निर्भय कन्या अभियान- विद्यार्थिनींना स्वसंरक्षण करता यावे, आत्मविश्वासाने जगता यावे व त्यांच्या विविध कौशल्यांचा विकास व्हावा या उदात्त हेतूने महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत "निर्भय कन्या अभियान" आयोजित करण्यात आले. या अभियानामध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी श्री सचिन पवार सर यांना निमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थिनींना कराटेच्या माध्यमातून स्वसंरक्षण कसे करावे याबद्दलचे प्रशिक्षण दिले. तसेच या अभियाना अंतर्गत "विवाहपूर्व समुपदेशन" या विषयावर प्राध्यापिका सुरेखा देशमुख मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्याचबरोबर "युवतींचे आरोग्यविषयक समस्या व समाधान" या विषयावर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ.सौ मंजुषा सातपुते मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

विद्यार्थी विकास मंडळांतर्गत आयोजित केलेल्या विविध उपक्रमांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यालयीन स्टाफ व सहकारी प्राध्यापक, प्रध्यापाकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी - विद्यार्थिनी विशेष करून कमवा व शिका योजनेचे विद्यार्थी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

प्रा. रमेश अंबऋषी शितोळे
(एम. ए., बी. एड. सेट)
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी

# इतिहास विभाग

महाविद्यालयातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारा विभाग म्हणून इतिहास विभाग ओळखला जातो. विद्यार्थ्यांच्या पसंतीत इतिहास विभाग सतत अग्रेसर आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये द्वितीय वर्ष कला शाखेतील १६ विद्यार्थ्यांनी इतिहास विषय विशेष स्तरावर निवडला आहे. तर तृतीय वर्षात १४ विद्यार्थी इतिहास विषयातून पदवी घेत आहेत.

विभागांतर्गत कार्यक्रम:

**१.** सावित्रीबाई फुले जयंती- इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील आद्य शिक्षिका महिला उद्धारक सावित्रीबाई फुले जयंती दिनांक ०३ जानेवारी २०२३ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्यात्या म्हणून संस्थेच्या संस्थापक सचिव मा. सौ मृणालताई राजीव फराटे पाटील मॅडम या होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. प्रवीण कुरुमकर हे होते.

**२.** राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती - इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी साजरी करण्यात आली. प्रमुख व्याख्याते व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रा. प्रवीण कुरुमकर हे होते.

**३.** छत्रपती शिवाजी महाराज जयंती- इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी साजरी करण्यात आली. प्रमुख व्याख्याते व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजीव वसंतराव फराटे पाटील साहेब हे होते.

**४.** महात्मा ज्योतिबा फुले जयंती - इतिहास विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले जयंती दिनांक ११ एप्रिल २०२३ रोजी साजरी करण्यात आली. प्रमुख व्याख्याते म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा. रमेश शितोळे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजीव वसंतराव फराटे पाटील साहेब होते.

* २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील इतिहास विभागातील विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला | ९६ |
| २. | द्वितीय वर्ष कला | १६ |
| ३. | तृतीय वर्ष कला | १४ |

- २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात प्राध्यापकांनी प्रकाशित केलेले पेपर

➢ प्रा. रमेश अंबऋषी शितोळे यांनी एस.बी.कुल महाविद्यालय केडगाव ता.दौंड जि.पुणे येथे दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थित राहून संशोधन पेपर चे वाचन केले.

➢ प्रा. रमेश अंबऋषी शितोळे हे एकनाथ सीताराम दिवेकर महाविद्यालय, वरवंड ता.दौंड जि.पुणे येथे दिनांक २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी "नवीन शैक्षणिक धोरण २०२०" या विषयावर झालेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थित राहिले.

| अ.क्र | पेपरचे नाव | दिनांक | Impact Factor | ISSN | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कृतीशील समाजसुधारक : पंडिता रमाबाई | 03/02 2023 | ६.५३८ | २२७९-०४८९ | एस.बी. कुल महाविद्यालय केडगाव ता.दौंड जि.पुणे. |

- विद्यापीठ कामकाजातील सहभाग -:

➢ प्रा. रमेश शितोळे यांनी महाविद्यालयात विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून काम पहिले.

➢ प्रा. रमेश शितोळे यांनी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक ( IQAC Coordinator ) म्हणून काम पहिले.

➢ प्रा. रमेश शितोळे यांची तृतीय वर्ष कला या वर्गातील इतिहास पेपर क्र.३५१७२ यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या परीक्षा विभागाकडून पेपर सेटर म्हणून नियुक्ती झाली.

➢ प्रा. रमेश शितोळे यांनी तृतीय वर्ष कला सेमिस्टर पाच व सहा ऑक्टोबर/ नोव्हेंबर आणि मार्च / एप्रिल २०२२-२०२३ या कालावधीमध्ये पेपर चेकिंगचे काम केले.

प्रा. रमेश अंबऋषी शितोळे
(एम.ए.,बी.एड. सेट)
इतिहास विभाग प्रमुख

# INFORMATION OF SVPP COLLEGE LIBRARY

**About us:**

It has been said that library is a soul of any institutions. The strength of institute depends on its infrastructure, faculty and students. Considering this the institution has given more attention to the library. S.V.P.P Art's Commerce & Science College Library, Mandvgan pharata was established with the inception of the college in 2009. Library was established in the year 2009.Today the institution has its own specious library hall with all facilities. It can accommodate near 150 readers at a time. It is continuously developing.The Library has a good collection on diverse areas of knowledge such as Languages and Literature, Social Sciences, Pure and Applied Science, Competitive exam books etc. Our library is continuously serves for the students, teaching and non-teaching staff of the college with following vision, mission and objectives

**Vision**

- The Central Library provides value added services to the students and staff.
- To create the best citizen for nation.

**Mission**

- The mission of the Library is to Make Student's Overall Personality development and Carrier Programmed to develop a Library as Information & Knowledge Centre.
- To provide comprehensive print and electronic resources and services in support of teaching, learning and research needs of the student and faculty.

**Objectives**

- To Identify the user needs regarding Information
- To provide Circulation Service, Reference Service to the Students, Researchers & Staff of the college
- To enrich the information services.
- To support the extracurricular activities conducted by the college
- To support the research activity.

**Highlights**

- "Vriddhi" Software for Automation.
- Open Access Library
- Computerized Library
- Digital Facility
- Internet Facility to Students and Staff
- Support to Students in their Project Work.
- Clipping service
- Support to students for MPSC/UPSC Competitive Exams.
- News Paper reading facility to the stake holders

## Library Collection

Library has a collection of nearly 5017books. Nearly 300 books are purchased and processed every year in the library. Library subscribes nearly 10 periodicals. It has collection of maps, CD-ROMs, audio and video cassettes. Past question papers and syllabi are also made available.The collection is mainly strong in Arts and Commerce, however substantial quality information sources on humanities and social sciences are also available. The library has special collection of material for career guidance and competitive examinations.

| | | |
|---|---|---|
| 1 | Books | 5017 |
| 2 | Titles | 2065 |
| 3 | Periodicals / Magazines | 09 |
| 4 | National Journals | 0 |
| 5 | International Journals | 00 |
| 6 | E-Journals/ EBooks (NLIST) | 6000+/350000+ |
| 7 | PhD Thesis, M.Phil. | |
| 8 | CD'S | |
| 9 | Video Cassettes | 00 |
| 10 | Audio Cassettes | 00 |
| 11 | Bound Volumes | 00 |
| 12 | Newspapers | 5 |
| 13 | Maps | 6 |

## Library Services

Our college library provides following services:–

- Reading Hall/Study Room
- Home lending service
- Orientation to the college students about library
- Reference &Referral Service
- Reprography
- Interlibrary Loan facility
- Internet Searching and Printing

Selective Dissemination of information (SDI)

- Service
- CAS through

1. New Arrivals (Books and Journals)
2. Newspaper Clippings
3. Display Career oriented – Articles and Job recruitment Advts.

# Department of B.B.A. (C.A.)

## Annual Report of B.B.A.(C.A.) Department for the Academic Year 2022-23

* Name of the Department : Bachelor of Business Administration(Computer Application)
* Year Of Establishment : 2009
* Head of Department:

Asst. Prof. B.S. Taware (B.E.(Computer))
Mobile No.- 9822452029
Email- tawarebs127@gmail.com

BBA (Computer Application) formerly known as B.C.A course is under Faculty of Commerce. Department was established in 2009. Course is a magnificent blend of Computer, Management and Commerce. BBA(CA) course provides sound academic base in Computer as well as Business and provides exposure to project Development in second and Third year.

Department has full equipped laboratory, class room, licensed software's andmodern teaching aids. Experienced, dynamic and young teaching faculty contributes to the dissemination of technical knowledge and solves the real-time problems along withthe students.

Besides enriching the students academically, the department also strives to develop their overall personality and technical skills by organizing various activities for

the students throughout the year. Department adopts innovative teaching pedagogy aided by I.C.T. Students are encouraged to participate in curricular and extracurricular activities within and outside the college. Students of the department have been performing remarkably well in academics, sports, and cultural spheres. Department has the privilege of inviting some eminent personalities as guests

It gives me great pleasure to present an overall report of Computer Application Department for the academic year 2022-23.

**1) Admissions:**

| Class | Intake Capacity | Number of Admitted students |
|---|---|---|
| F.Y.B.B.A.(C.A.) | 80 | 80 |
| S.Y.B.B.A.(C.A.) | 80 | 30 |
| T.Y.B.B.A.(C.A.) | 80 | 19 |

**2) ACADEMIC PERFORMANCE:**

The department achieved excellent results.

F.Y.B.B.A.(C.A.) S.Y.B.B.A.(C.A.), T.Y.B.B.A.(C.A.) results of academic year 2021-22 are as follows:

**a) Class wise Results:**

F.Y.B.B.A.(C.A.) : 90.91%
S.Y.B.B.A.(C.A.) : 93.75%
T.Y.B.B.A.(C.A.) : 68.18%

**b( Class wise rankers are as follows:**

**F.Y.B.B.A.(C.A.)**

| Rank | Name of students | SGPA |
|---|---|---|
| 1 | Dhavale Sayali Ishwar | 8.14 |
| 2 | Garade Akanksha Ashok | 7.76 |
| 3 | Adsul Sachita Bharat | 7.48 |

**S.Y.B.B.A.(C.A.)**

| Rank | Name of students | SGPA |
|---|---|---|
| 1 | Gavali Tejas Shahaji | 9.18 |
| 2 | Pawar Abhishek Shivaji | 9.09 |
| 3 | Shaikh Avesh Iliyas | 8.91 |

**T.Y.B.B.A.(C.A.)**

| Rank | Name of students | SGPA |
|---|---|---|
| 1 | Pharate Swapnil Jalindar | 8.22 |
| 2 | Sayyad Safiya Salim | 8.09 |
| 3 | Kambale Snehal Sakharam | 8.00 |

**3) STUDENTS PLACEMENTS:**

Prof. Taware B.S. is working as member for the Placement department. Following students of B.B.A.(C.A.) faculty for academic year 2021-22 are placed in various companies till date. The details are as follows:

| Sr. No. | Name of Placed Students | Name of Company |
|---|---|---|
| 1 | Kambale Vishal Bharat | Primus HQ,Pune |
| 2 | Nandkhile Pritam Pratap | EXL service .Com Pvt.ltd, Pune |
| 3 | Shiplakar Rohan Subhash | Components India Pvt.Ltd,Pune |
| 4 | Gaikwad Manoj Sanjay | Jabil,Pune |
| 5 | Kapre Sachin Arjun | L & T Financial Services,Pune |
| 6 | Sakat Aniket Gulab | Jabil,Pune |

**4) INDUSTRY - INSTITUTE INTERACTION:**

B.B.A.(C.A.) Department had organized an industrial visit on 27 May , 2023 to IUCAA which is in the campus of Savitribai Phule Pune University, Pune., and IT Company named PRIMUS HQ which is located at Pan Card Club Road, Near Mukute Garden,Baner,Pune. This visit was for students of S.Y.B.B.A.(C.A.) and T.Y.B.B.A.(C.A.) class.

The visit was organized by HOD Prof. Taware B.S. of B.B.A.(C.A.) Department. Prof. Padale N.D. and Prof. Dangade A.H were the co-ordinators Faculty for the industrial visit. Totally 30 students along with 3 coordinators faculty were there in the journey. This visit was very beneficial for our students. From this visit they got lot of knowledge and experience about IT Industry.

**5) EXPERT LECTURES BY FACULTY OUTSIDE THE INSTITUTE :**

Department had invited Guest Lecturers from other institutes to deliver the guest Lectures on various subjects. Due to this our students had got additional knowledge from expert faculties.

**6) ONLINE ACTIVITIES:**

In this academic year our department had been organized Online Certification Course on PHP Language during 5 May 2023 to 22 May 2023. This Course was conducted by Orange ITech Services,Pune. This course was for students of S.Y.B.B.A.(C.A.) and T.Y.B.B.A.(C.A.).For this course the resource person was Mrs. Archana S. Nigade from Orange Itech Services,Pune. This course was very beneficial for our students. From this course they got lot of knowledge and practical experience about PHP Language. On Completion of course, every student had given certificate by Orange ITech services, Pune.

**7) DEPARTMENTAL l ACTIVITIES:**

a) Vachan Prerana Divas-

To honor the birth anniversary of our late President Dr. APJ Abdul Kalam Sir, "Vachan Prerana Divas" (Inspire to Read Day) is celebrated on 15th October, so that the students understand the importance of reading and are encouraged to develop it as a hobby.

b) Spiritual Importance of Raksha Bandhan:

On the occasion of Rakshabandhan ,Department of B.B.A.(C.A.) had conducted Guest lecture on "Spiritual Importance of Raksha Bandhan". The resource person was B.K. Vaishali from Bramha kumari Center, Mandavgan Pharata. From this lecture students got spiritual importance of Raksha bandhan an koowledge of Indian culture.

c) Teacher's day :

Teachers Day had celebrated on September 5,2022 to acknowledge the contribution of teachers in the society. The day marks the birth anniversary of Indias second President and first Vice President Dr Sarvepalli Radhakrishnan.

d) Freshers Day:

College had organized fresher's party for newly admitted students. The main aim of this party

was to give an affectionate welcome to new students. Such parties instill confidence in students and enhance their creativity. It was accompanied by so many exciting events and programs like ramp walk, traditional, fusion, and modern dances, breathtaking singing performances, and splendid decoration, thus making it a soulful experience.

Department is committed to impart quality education through various curricular, co- curricular and extra-curricular activities. Our only dream is to help the students to realize their dreams.

**Asst. Prof. B.S.Taware**
(Head of Department B.B.A.(C.A.)

# मराठी विभाग

- २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात अनेक दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. आयोजनामागील भूमिका विद्यार्थ्यांची भाषेकडे आणि समाजमनाकडे बघण्याच्या जाणीव विकसित करणे ही होती.

➢ २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वाचन प्रेरणा दिन' १५ ऑक्टोबर २०२२ रोजी संपन्न झाला. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. सुरेखा देशमुख प्रमुख वक्त्या होत्या.

➢ महाविद्यालयात २७ फेब्रुवारी २०२३ रोजी 'मराठी भाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. रमेश शितोळे यांनी आपल्या व्याख्यानातून मराठी भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

- २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील मराठी विभागातील विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला | ९६ |
| २. | प्रथमवर्ष वाणिज्य | ८६ |
| ३. | द्वितीय वर्ष कला | १७ |
| ४. | तृतीय वर्ष कला | ०६ |

- २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात प्राध्यापकांनी प्रकाशित केलेले पेपर

प्रा. सुरेखा देशमुख

| अ.क्र | पेपरचे नाव | दिनांक | Impact Factor | ISSN | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | पंडिता रमाबाई एक स्त्री समाजसुधारक | ०३/०२/२०२३ | ६.५३८ | २२७९–०४८९ | एस.बी.कुल महाविद्यालय केडगाव त.दौंड जी.पुणे. |
| २. | साहित्य आणि संस्कृती (विशेष संदर्भ २००० नंतरचे साहित्य) | ०४/०२/२०२३ | ९.१५४ | २३१९-९३१८ | तेरणा महाविद्यालय (कला,वाणिज्य व विज्ञान) उस्मानाबाद |

- २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात प्राध्यापकांनी केलेली प्रगती.

➢ प्रा. सुरेखा विठ्ठल देशमुख यांनी विद्यावाचस्पती पदवीसाठी 'प्रवरा रुरल एजुकेशन सोसायटी पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्टस् सायन्स अँण्ड कॉमर्स प्रवरानगर लोणी तालुका - राहता जिल्हा -अहमदनगर या मराठी विभाग संशोधन केंद्रामध्ये **" संत एकनाथांच्या भारूडातील भाषिक आणि सांस्कृतिक अभ्यास " या विषयावर** डॉ. सांगळे संदीप विठ्ठलराव अध्यक्ष सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे (मराठी विभाग ) यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये प्रवेश घेतला आहे.

➢ प्रा. दत्तात्रय मच्छिंद्र पवार यांनी विद्यावाचस्पती पदवीसाठी 'प्रवरा रुरल एजुकेशन सोसायटी पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्टस् सायन्स अँण्ड कॉमर्स प्रवरानगर लोणी तालुका - राहता जिल्हा -अहमदनगर या मराठी विभाग संशोधन केंद्रामध्ये **"संत एकनाथांच्या वाङ्मयातील स्त्रीचित्रण : एक विवेचक अभ्यास" या विषयावर प्रा. डॉ. सुनील जगन्नाथराव निगडे** प्राचार्य एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालय वरवंड ता. दौंड जि.पुणे. यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये प्रवेश घेतला आहे.

- विद्यापीठ कामकाजातील सहभाग -:

➢ प्रा. दत्तात्रय मच्छिंद्र पवार हे महाविद्यालयाच्या परिक्षा विभागाचे विभाग प्रमुख म्हणून काम पाहतात.

➢ प्रा. सुरेखा विठ्ठल देशमुख या बाहि:शाल शिक्षण मंडळ व जेष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे या विभागाच्या केंद्र कार्यवाहक म्हणून काम पाहतात. त्याच बरोबर तृतीय वर्ष कला सेमिस्टर पाच व सहा ऑक्टोबर/ नोव्हेंबर आणि मार्च / एप्रिल २०२२-२०२३ या कालावधीमध्ये पेपर सेटिंग चे व पेपर चेकिंगचे काम केले आहे.

# Department of Computer Science

**Name of Department**
Department of Computer Science
Shri VasantraoPharate-Patil Arts, Commerce and Science College,
MandavganPharata ,Tal-ShirurDist Pune.

**Year of Establishment**
2009-10We have affiliated of Savitribai Phule Pune University for UG Level and provided education of general level subject.

**Mission of Department**
Provide relevant, up-to-date, and career-oriented education in Computer Science

**Aims and Objective of Department**

- To avail the qualitative education in Computer Science at UG level in rural area.
- To ensure the overall personality development of students through extracurricular and co-curricular activities.
- To organize various extension activities for cultivation of use of computer to in day to day life and or society.
- To transfer the knowledge and skills for fulfilment of the changing needs of society in the process of modernization.
- To invoke the Computer and advance Technology interest among the students.

**Silent Features of the Department:-**

- Established in 2010 Pioneer in the field of Computer Science.
- Well-equipped Lab with ultra-modern facilities.
- Young, experienced, qualified and highly motivated staff.
- Wi-Fi enabled department.
- Strong and active alumni support.

## Head of Department

Prof. Ninad D.Padale- M.Sc.(Elc.Sci), B.Ed.D.S.M.

**Intake Capacity of Students:**

| Sr. No. | ClassIntake | Capacity |
|---|---|---|
| 1 | F. Y. B.Sc.(C.S.) | 80 |
| 2 | S. Y. B.Sc.(C.S.) | 80 |
| 3 | T. Y. B.Sc.(C.S.) | 80 |

**Admissionfor Academic year 2022-23**

| Sr. No. | Class | Male | Female |
|---|---|---|---|
| 1 | F.Y.B.Sc.(C.S.) | 53 | 27 |
| 2 | S.Y.B.Sc.(C.S.) | 11 | 11 |
| 3 | T.Y.B.Sc.(C.S.) | 13 | 07 |
| | Total | 77 | 45 |
| | Grand Total | 122 | |

**Teaching Staff**

| Sr. No. | Name of the Faculty | Qualification | Experience |
|---|---|---|---|
| 1 | Prof .NinadD.Padale | M.Sc.(Ele.Sci.),B.Ed. D.S.M. | 7 Years |
| 2 | Prof. Balasaheb S. Taware | B.E. Computer | 20 Years |
| 3 | Prof. Sarika S. JagtapM.Sc.(Math) | B.Ed. | 04 Years |
| 4 | Prof. Aishwarya H. Dangade | M.Sc.(Math) B.Ed. | 01 Years |
| 5 | Prof. Harsha T. Jagtap | M.Sc.(C.S.) | 01 Years |

**Events**

1. **Guest Lecturer** –An guest Lecturer was arranged for the F. Y. B.Sc.(C.S.) students on Semiconductor Devises and Basic Electronic System on 10th of December,2022 in which total 51 students had participated.

2. **Mathematics Day** – Mathematics Day was Celebrated on 28th of December,2022

3. **Poster Presentation Competition**- Poster Presentation Competition was organizedon 20th April, 2023for Computer Science Department students in which RauthVaishnavi Kailas secured first Prize for her poster on Artificial intelligence the competition was organised.

4. **Workshop**- One Day Workshop was arranged on Python problems in Mathematics Practical on 6th, May, 2023. For. S.Y. B.Sc.(C.S.) students.

5. **Workshop**- One Day Workshop was arranged on Advanced Technologies on18th, May, 2023. For Computer Science Department Students 117 students were the beneficiary of the work shop.

6. **Workshop**- Workshop was arranged on Python as a part of curriculum on 6th, May, 2023. For S.Y. B.Sc.(C.S.)and T.Y. B.Sc.(C.S.)Students.

**Workshop Seminars Attended –**

Prof.PadaleNinad D.Attended Two Day NationalWorkshop on"Industry – InstituteLinkages "Perspective:NEP 2020 at C.T.Bora College Shirur.

**Top Three Students**

**F.Y.B.Sc.(C.S.)**

| | |
|---|---|
| 1. ThoratVaishnaviBhausaheb- | 8.73 SGPA |
| 2. KeswadSnehaShivaji- | 8.66 SGPA |
| 3. HolkarShraddha Ashok- | 8.50 SGPA |

**S.Y.B.Sc.(C.S.)**

| | |
|---|---|
| 1.GarudAkanshaBapurao- | 8.64 SGPA |
| 2. Pawar Nikita Appaso- | 8.55 SGPA |
| 3. Kamble Aditya Satish- | 8.45 SGPA |

**T.Y.B.Sc.(C.S.)**

| | |
|---|---|
| 1. Pharate Nikita Navnath- | 80.59 SGPA |
| 2. ShindePrashant Ashok- | 81.18 SGPA |
| 3. HolkarRushikeshJalindar- | 80.59 SGPA |

**Future Plan**

To start Post Graduation Course in Computer Science.
To Organize National Level Seminar.

# BBA Department

- Name of the Department : Bachelor of Business Administration
- Shri WagheshwarGramvikasPratisthan's Shri VasantraoPharate-Patil Arts, Commerce & Science College, MandavganPharata, Tal-Shirur, Dist-Pune 412211
- Year Of Establishment : 2009

BBA course is under Faculty of Commerce. It was established in 2009. Management and Commerce. BBA course provides sound academic base in Computer as well as Business and provides exposure to project Development in second and Third year.

Department has full equipped class room and modern teaching aids. Experienced, dynamic and young teaching faculty contributes to the dissemination of technical knowledge and solves the real-time problems along with the students.

Besides enriching the students academically, the department also strives to develop their overall personality and technical skills by organizing various activities for the students throughout the year. Department adopts innovative teaching pedagogy aided by I.C.T. Students are encouraged to participate in curricular and extracurricular activities within and outside the college. Students of the department have been performing remarkably well in academics, sports, and cultural spheres. Department has the privilege of inviting some eminent personalities as guests to interact with the *students*

## HOD Desk

*Asst. Prof :Kurumkar .D.C*

*Head of Department & Assistant Professor*

*Mobile No.- 9021220952*

*Email- pravinkurumkar@gmail.com*
*Welcome to the Department of BBA at Shri VasantraoPharate -Patil Arts, Commerce & Science College. Department is established in the year 2009.*

## Teaching Staff

Name Of The Professor Qualification *Designation*Prof. Kurumkar D.C MBAAsst .ProfessorProf. Kokare .S.S*MBA,M.Com,M.C.A.MCM*

*GDC&A*Asst .ProfessorProf.More .A.AMBAAsst .ProfessorProf.Tambe S.BMBAAsst .ProfessorProf. Jagtap S.SMSC Asst .ProfessorProf. Jagtap V.SMBAAsst .Professor

**BBA Department Year Wise Enrollment Chart**

| Class | 2017-2018 | 2018-2019 | 2019 20 | 2020 21 | 2021 22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|
| F.Y.B.B.A | 40 | 76 | 66 | 44 | 34 | 60 |
| S.Y.B.B.A | 42 | 31 | 50 | 50 | 30 | 40 |
| T.Y.B.B.A | 30 | 42 | 23 | 58 | 39 | 34 |

# Department of English

The Department of English was established in 2012.The Department of English is presently headed by Professor Vikas Shinde. TheDepartment is the backbone of the Arts faculty .Since every student has to offer English as compulsory subject from the entry at first year to the final year of graduation . As one of the important department of the college, it has played a silent role in the academic ambience of the college. The Department of English offers elective English special course for undergraduates Where they are familizred with the basic goners of literature and are introduced to the branches of language study such as, Linguistics, Pragmatics and Discourse analysis.Our department apart from regular teaching process conduct several enriching activities. Like great speech competition, Poster making, Paper presentation.

English is compulsory subject and offered to all courses. English is taught at both Special and General level .English is not only taught to the courses FYBA. SYBA. and TYBA. but aslo for SYBsc. (Computer science) and FY.B.Com.

| Sr.No. | Class /subject | Student |
|---|---|---|
| 1. | FYBA.(COMPULSORY ENGLISH) | 96 |
| 2. | FYBA.(OPITIONAL ENGLISH) | 19 |
| 3. | SYBA.(COMPULSORY ENGLISH) | 42 |
| 4. | SYBA.(SPECIAL ENGLISH) | 10 |
| 5. | TYBA.(COMPULSORY ENGLISH) | 22 |
| 6. | TYBA.(SPECIAL ENGLISH) | 03 |
| 7. | FY.B.COM.(COMPULSORY ENGLISH) | 99 |
| 8. | SY.BSC.(CS).(COMPULSORY ENGLISH) | 22 |

# आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३ अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मांडवगण फराटा यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कार्यरत असून या विभागाच्या माध्यमातून विविध विषयांचे व्याख्याने आयोजित केली जातात. विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आपले जीवन अधिक चांगले करण्यासाठी व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविणे तसेच समाज व उच्च शिक्षण यामधील जवळीक वाढविणे, समाजकार्यात विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे. समाजिक वास्तवातून उच्च शिक्षणास बळकटी मिळवून देणे. उच्च शिक्षण आणि समाज यामधील दुवा वाढ विणे अशा मधून विद्यार्थी सर्वगुण संपन्न होईल. आजीवन अध्ययन विस्तार सतत प्रयत्नशील आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आजीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत विवाहपूर्व समुपदेशन व रोजगार आणि उद्योजकता या विषयावर व्याख्याने आयोजित केली.

### रोजगार आणि उद्योजकता कार्यशाळा :-

आजीवन अध्ययन व विस्तार कार्यक्रम अंतर्गत घेण्यात आलेल्या "रोजगार आणि उद्योजकता" या विषयावर दि. १७/०२/२०२३ रोजी डॉ. विवेक सातपुते व प्रा.शरद शिंदे यांचे व्याख्यान आयोजित क रण्यात आले होते.या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.सोनाली म्हेत्रे यांनी केले तर या कार्यक्रमाची प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अधिकारी प्रा. पवार जे. एस. यांनी केले व कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्राचार्य प्रविण कुरुमकर यांनी भुषविले. डॉ. विवेक सातपुते यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना वाढती लोकसंख्या आणि नोकरांचा अभाव रोजगारासाठी व्यक्तीला प्रेरित ज्या वेगाने लोक संख्या वाढत आहे त्या प्रमाणात लोकांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे सर्वत्र बेरोजारीच प्रमाण वाढत आहे. तुमच्यामध्ये दडलेली प्रतिभा बाहेर आणण्यासाठी तुमच्या कौशल्यामुळे लोंकाच्या जीवनात मोलाचीभर घालण्यासाठी स्वरोजगार आवश्यक आहे.यातून लोकांचे जीवन अधिक सुखकर होते असे अनेक उदाहरणे देऊन मत व्यक्त केले. तसेच प्रा. शरद शिंदे यांनी आपली मानसिक ता पूर्ण बदलल्याशिवाय अंगी उद्योजकाचे गुण येणार तर नोकरदाराची प्रवृत्ती वृद्धासारखी, मरगळलेली असते तर उद्योजक कामासाठीकि ती दिवस मिळतात, याची गणती करतो, असा फरक ही त्यांनी दाखवून दिला आहे. असे अनेक थोर उद्योजक कसे घडले त्यांनी उदाहरणातून सांगितले. तसेच प्रा.सारिका जगताप यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली.

### विवाहपूर्व समुपदेशन कार्यशाळा :-

आजीवन अध्ययन व विस्तार क ार्यक्र म अंतर्गत घेण्यात आलेल्या "विवाहपूर्व समुपदेशन" या विषयावर दि. २४/०२/२०२३ रोजी डॉ. दिपाली जाधव व प्रा.सुरेखा देशमुख यांचे व्याख्यान आयोजित क रण्यात आले होते.या क ार्यक्र माचे सुत्रसंचालन प्रा.रमेश शितोळे यांनी केले तर या कार्यक्रमाची प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अधिकारी प्रा. पवार जे.एस. यांनी केले व कार्यक्रमाचे अध्यक्षपद सौ.मृणालताई फराटे पाटील यांनी भुषविले.डॉ. दिपाली जाधव यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन क रताना विद्यार्थ्यांमध्ये स्त्री-पुरुष समानता व वैवाहिक कायदेशीर बार्बीची जाणीव निर्माण केली पाहिजे. वैवाहिक समायोजनआणि लैंगिक शिक्षण, विवाहापूर्वी समुपदेशानाची गरज दिवसेंदिवस वाढ त चाललीय.वरवरच्या आकर्षणापलीकडे समोरच्याचे व स्वतःचेही गुण-दोष डोळसपणाने तपासून पहावे.तसेच स्त्री ही समाजाची निर्माती आहे, स्त्रियांनी आर्थिक सक्षम होऊन आत्मबळ वाढ वले पाहिजेयासाठी स्त्रियांनी प्राणायामाचे महत्व देखील पटवून दिले. या क ार्यशाळेत विद्यार्थीनीहीउस्फुर्तपणे सहभाग नोंदवला. तसेच प्रा. सुरेखा देशमुख यांनी महिला अबला नसून सबला आहेत असे विविध उदाहरण देऊन सांगितले.तसेच महिलांना अनेक कायदे असून त्यामध्ये स्त्रीभुणहत्या कायदा,कुटुंबप्रतिबंध कायदा,हुंडा प्रतिबंध कायदा,बालविवाह प्रतिबंध कायदा ,याबदल माहिती सांगितली.तसेच प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत झालेली प्रगती या बदल माहिती सांगितली.तसेच प्रा.सोनाली म्हेत्रे यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली.

| अ.क्र. | दिनांक | व्याख्यानाचा विषय | व्याख्याते | लाभार्थी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | १७/०२/२०२३ | रोजगार आणि उद्योजकता | डॉ.विवेक सातपुते व प्रा. शरद शिंदे | १४१ |
| २ | २४/०२/२०२३ | विवाहपूर्व समुपदेशन | डॉ.दिपाली जाधव व प्रा.सुरेखा देशमुख | १६५ |

**प्रा.जयराम पवार**
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
कार्यक्रम समन्वयक

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## वार्षिक अहवाल
## शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३

"No>t Me But You" या उक्तीस अनुसरून समाजसेवेचे व्रत युवकांमध्ये रुजवण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग आपल्या श्री वसंतराव फ्फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून कार्यरत आहे.राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे,त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण विकसित करणे,परस्पर सहकार्याची भावना वाढीस लावणे,त्याच बरोबर राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे तंत्र विकसित केले जाते.शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयाने २४/०९/२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रविण कुरुमकर यांच्या हस्ते झाले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली.या दिवशी प्रा.दिनेश पवार यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांचे योगदान या विषयावर व्याखान आयोजित करण्यात आले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वर्ष भर विविध उपक्रम राबविले जातात,त्यामध्ये थोर समाजसुधारक,क्रांतिकारक यांची जयंती,रक्तदान शिबीर,आरोग्य तपासणी,वृक्षारोपण,प्रभात फ्फेरी,पथनाट्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन, स्वच्छता मोहीम,व्यसनमुक्ती जनजागृती,पर्यावरण जाणीव जागृती,विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमांतून विविध विषयावर व्याखान मालेचे आयोजन करण्यात येते.श्री वाघेश्वर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजीव फ्फराटे पाटील,सचिव सौ.मृणालताई फ्फराटे पाटील,प्राचार्य प्रविण कुरुमकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी जयराम पवार,प्रा.सोनाली म्हेत्रे,विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा.रमेश शितोळे,प्रा बाळासाहेब तावरे,प्रा.निनाद पाडळे प्रा.दत्तात्रय पवार,प्रा.अनिल भिसे,प्रा शरद शिंदे,सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.त्या बद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मनपूर्वक धन्यवाद व्यक्त करतो.

### राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ राबविलेले विविध उपक्रम :-

**हर घर तिरंगा अभियानः-** भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून भारतीय राष्ट्रध्वज असणारा तिरंगा झेंडा अपलोड करण्याचे विक्रमी उद्धीष्ट करण्याचे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास मंडळाने हाती घेतला आहे. त्याची नोंद स्वातंत्र्यदिनी गिनीज वर्ल्ड ऑफ्फ रेकॉर्ड मध्ये केली जाणार आहे. आहे. श्री वसंतराव फ्फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी व इतर प्राध्यापक यांनी तिरंगा ध्वजासह स्वतःचा फोटो घेऊन अपलोड करून मम हर घर तिरंगाफ्फया अभियानास महाविद्यालयातून प्रारंभ केला. उपस्थित संस्थेच्या संस्थापक सचिव सौ मृणालताई फ्फराटे पाटील मॅडम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी झाले होते भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षांमध्ये मोठ्या संख्येने मम माझा तिरंगा माझा अभिमानफ; मानून मोठ्या संख्येने या मम हर घर तिरंगा फ्फ सदर उपक्रमामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन प्राचार्य प्रा. प्रविण कुरुमकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी हर घर तिरंगा अभियानात सक्रीय सहभाग घेतला.

### ५ सप्टेंबर शिक्षक दिन :

५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले या निमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त करण्यात आले. यावेळी विविध उपक्रम व स्पर्धा ही घेण्यात आल्या तसेच विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षकांबद्दल आदरभाव व्यक्त केला व आपल्या जीवनातील शिक्षकांचे महत्त्व विविध उदाहरणे देऊन पटवून दिले. प्राचार्य प्रवीण कुरुमकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजचा दिवस गुरु विषयी आदर भावना व्यक्त करण्याचा दिवस आहे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाचे असते त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाचे असते त्यांचे योगदानही महत्त्वाचे आहे. शिक्षकांशिवाय विद्यार्थी पूर्ण होऊ शकत नाही कारण शिक्षक विद्यार्थ्याला योग्य भविष्य आणि योग्य मार्गावर चालायला शिकवतो तसेच चांगल्या व अयोग्य ची समज शिकवतो अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना या दिवशी शिक्षकाच्या या मेहनती बद्दल आभार मानण्याची संधी मिळते म्हणून हा दिवस सर्व विद्यार्थ्यासाठी खूप महत्त्वाचा मानला जातो असे मत व्यक्त केले.

### राष्ट्रीय सेवा योजना दिवसः-

मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रवीण कुरुमकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दिनेश पवार लाभले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना गीताने झाली प्रा. दिनेश पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच महाविद्यालय आणि समाज यांच्यामध्ये समाज विकास साठी आवश्यक मूल्य या योजनेच्या माध्यमातून रुजवली जातात तसेच राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना नवी वाट, नवी दिशा, नवीन शोध व क्षमतांचा शोध

देणारी माध्यम आहे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजना ही सतत कार्यरत असते असे मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना की श्रमसंस्काराबरोबर मूल्यही शिकवते नम्रपणा विनयशीलता धमनिष्ठ या गुणांनी परिपूर्ण होऊनच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वयंपूर्ण होतो असे मत व्यक्त केले.

**हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबीर:-**

मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय च्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आणि प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवगण फ्फराटा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबीर नुकतेच संपन्न झाले. या शिबिरामध्ये ३९७ विद्यार्थिनीची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंजुषा सातपुते यांनी उपस्थित विद्यार्थिनीना युवतीचे आरोग्य समस्या व उपाय या विषयावर मार्गदर्शन केले.राष्ट्रीय सेवा योजना व प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवगण फ्फराटा यांच्या वतीने माता सुरक्षित घर सुरक्षित या योजने अंतर्गत हे शिबीर घेण्यात आले. या मध्ये युवतींना उभावणारा समस्या याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

**ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती:-**

महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न हे तरुणांच्या जीवावरच पहिले होते . २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल, असे भाकीत डॉ. कलाम यांनी व्यक्त केले होते . कारण देशातील तरुणाकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या. तसेच डॉ. कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवीन दिशा मिळते, असे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फ्फराटे पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणून प्रा.सुरेखा देशमुख यांनी आपले मत व्यक्त करताना डॉ. कलाम यांनी देशासाठी केलेले कार्य यावर विचार मांडले प्रा जयराम पवार, प्रा. प्रतीक्षा कोठारी तसेच विद्यार्थी सविता निकम यांनीही आपली मते मांडली.

**राजमाता जिजाऊ जयंती:-**

महाविद्यालयात राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. राजमाता जिजाऊ यांनी केवळ शिवबानाच घडवले नाही तर महिलांना देखील प्रेरणा दिली. आजही महिला मुलांना घडविताना राजमाता जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतात. स्वातंत्र्य स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण यासाठी प्रयत्न करणाऱ्या राजमाता जिजाऊ जगभरातील माता भागीनीसाठी आदर्श आहेत, असे मत प्राचार्य कुरुमकर सर यांनी व्यक्त केले .राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व विवेकानंद जयंती साजरी केली, यावेळी प्राचार्य बोलत होते.

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर :-**

श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर दिनांक २८/१२/२०२२ ते ०३/०१/२०२३ रोजी मौजे पिंपळसुटी ता शिरूर जि.पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आले. या सात दिवसाच्या या शिबिरात ग्रामस्वच्छता ,महिला जनजागृती ,वृक्षारोपण ,व्यसनमुक्ती ,मोबाईल चा अतिवापर झाडे लावा झाडे जगवा ,लेक वाचवा लेक शिकवा ,या बाबत पथनाट्याच्या माध्यमातून समाज प्रबोधनकेले जाते. अशी माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा.जयराम पवार यांनी दिली.उद्घाटन प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर फराटे पाटील यांनी महाविद्यालयाच्या वतीने २०१३ पासून परिसरातील गावात शिबिराचे आयोजन केले आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून परिसराचा कायापालट केला.तसेच वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढली आहे.संस्थेला अशा कामाचा अभिमान आहे असे मत व्यक्त केले.या शिबिरात दिनांक २९/१२/२०२२ रोजी ह .भ.प .विशाल महाराज फ्फलके यांचे संत साहित्यातील पर्यावरण या वर व्याख्यान आयोजित करण्यात आले . दिनांक ३०/१२/२०२२ रोजी प्रा दिनेश पवार यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांचे योगदान या वर व्याख्यान आयोजित केले.३१/१२/२०२२ रोजी डॉ प्रकाश पांढरमिसे यांचे आजची तरुणाई यावर व्याख्यान दिले.०१/०१/२०२३ रोजी शरद शिंदे यांचे आर्थिक साक्षरता काळाची गरज यावर व्याख्यान दिले. दिनांक ०२/०१/२०२३ रोजी स्वयंसेवकांनी प्रभात फ्फेरी काढून पथनाट्य सादर करून जनजागृती केली.मनोज वाबालेयांचे एकच ध्यास व्यक्तिमत्व विकास यावर व्याख्यान आयोजित केले. अशा सर्व कामांची दखल विविध वृत्त पत्राने घेतली.पिंपळ सुटी ग्रामस्त यांच्याकडून कामाचे कौतुक करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या...

**प्रा. जयराम सुनिल पवार (एम.ए.नेट)**
**राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी,**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग समन्वयक**
**शिरूर तालुका**

# भूगोलशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भूगोल हा विषय सामान्य स्तरावर शिकवला जातो.महाविद्यालयातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारा विभाग म्हणून भूगोल शास्त्र विभाग ओळखला जातो. महाविद्यालयात भूगोल विषयाचे अध्ययन शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून केले जाते.या विषयाचे अध्यापनाचे कार्य प्रा.जयराम पवार करतात.भूगोल विषयाच्या अध्यापनाबरोबर क्षेत्रभेटी,विषय गटचर्चा, शैक्षणिक सहल,यांचे आयोजन केले जाते.त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये १४ जानेवारी हा भूगोल दिन साजरा करण्यात आला.या दिवशी प्रा.सुरेखा देशमुख यांचे पर्यावरण जाणीव जागृती या विषयावर व्याखान आयोजित केले.महाविद्यालयात Poster Presentation ,Model Presentation,Quiz Compitaion, या सारखे उपक्रम राबविले जातात. त्याच प्रमाणेभूगोलशास्त्र विभाग अंतर्गत विविध विशेष दिनाचे आयोजन केले जाते.भूगोल दिन,लोकसंख्या दिन,पर्यावरण दिन,विज्ञान दिन,जागतिक वसुंधरा दिन या व्यतिरिक्त वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम,प्रभात फ़ेरीच्या माध्यमातून पर्यावरण जाणीव जागृती या विषयी जनजागृती केली जाते.

* २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील भूगोल विभागात शिक्षण घेतलेले विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | वर्ग विद्यार्थी | संख्या |
|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला | ९६ |
| २. | द्वितीय वर्ष कला | ३९ |
| ३. | तृतीय वर्ष कला | २० |

* २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात चर्चा सत्रास उपस्थित होते.

* प्रा. जयराम सुनिल पवार हे एकनाथ सीताराम दिवेकर महाविद्यालय, वरवंड ता.दौंड जि.पुणे येथे दिनांक २४ व २५ फेब्रुवारी २०२३ रोजी "नवीन शैक्षणिक धोरण २020" या विषयावर झालेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थित राहिले.

* विद्यापीठ कामकाजातील सहभाग -:

* प्रा. जयराम सुनिल पवार यांनी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पहिले.
* प्रा. जयराम सुनिल पवार यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिरूर तालुका विभागीय समन्वयक म्हणून काम पहिले.
* प्रा. जयराम सुनिल पवार यांनी महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभाग समन्वयक म्हणून काम पहिले.
* प्रा. जयराम सुनिल पवार यांनी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय शिरूर या ठिकाणी बहिस्थ परीवेक्षक म्हणून काम पहिले.

प्रा. जयराम सुनिल पवार
( एम.ए. नेट)
भूगोलशास्त्र विभाग प्रमुख

# "भारताचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था"

**भारताचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाने जुलै २०२० मध्ये मान्यता दिली होती, ज्याचा उद्देश भारताच्या शैक्षणिक संरचनेत बदल घडवून आणण्याचा आहे. हे धोरण राष्ट्रीय शिक्षण धोरण, १९८६ ची जागा आहे. समितीच्या सदस्यांनी शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण संरचनात्मक बदलाची शिफारस केली आणि काही प्रगतीशील बदलांची निवड केली परंतु भारतीय ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला तोंड देत असलेल्या सततच्या आव्हानांकडे दुर्लक्ष केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने याकडे दुर्लक्ष केले की सरकारी शाळांमध्ये केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थीच शिक्षण घेतात आणि हे वेगळेपण भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोर मोठे आव्हान आहे आणि छएझ या समस्येचे निरीक्षण करण्यात अपयशी ठरले आहे. वैद्यकीय आणि कायदा यासारखे व्यावसायिक अभ्यासक्रम लोकांमध्ये खूप लोकप्रिय असले तरी विशेषतः एलएलबीमध्ये प्रवेश घेणे थोडे सोपे आहे कारण कायदा अभ्यासक्रम देशभरात उपलब्ध आहेत आणि आमच्याकडे कूचबिहारमध्ये कायदा महाविद्यालय देखील आहे. ग्रामीण उमेदवारांना व्यावसायिक शिक्षणात प्रवेश मिळणे कठीण होत आहे आणि त्यांच्या पदवी आणि नोकरीच्या बाजारपेठेतील सुसंगतता नसल्यामुळे बेरोजगारी वाढली आहे. परिणामी, ते स्वतःला 'बेरोजगार' आणि बेरोजगार दोन्ही शोधतात. हे मुद्दे अहवालात नमूद केलेले नाहीत.

**भारतातील ग्रामीण शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने:**

**आर्थिक समस्या**:मुळात, ग्रामीण भागातील पालकांच्या कमी उत्पन्नामुळे शिक्षणाला गुंतवणुकीऐवजी खर्च मानले जाते. जेव्हा उच्च शिक्षणाचा विचार केला जातो तेव्हा जवळपासच्या सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना शहरांमध्ये स्थलांतरित व्हावे लागते आणि त्यामुळे त्यांच्या खर्चात भर पडते. आणि यामुळे उच्च शिक्षणात नावनोंदणीचे प्रमाण कमी होते. मार्गदर्शनाचा अभाव:ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या समस्येचा सामना करावा लागतो. आणि या मार्गदर्शनाची गरज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांनाही आवश्यक आहे.

**लिंग समानता**: ग्रामीण भारत अजूनही लैंगिक असमानतेच्या समस्येला तोंड देत आहे, काही प्रदेशांमध्ये मुलींना शाळेत जाण्याची परवानगी नाही.

**पायाभूत सुविधांचा अभाव**: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मूलभूत शिक्षणाची साधने, तसेच सुसज्ज वर्ग खोल्या, ग्रंथालये, प्रयोगशाळा उपलब्ध नसतात आणि त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खराब होतो.ग्रामीण भागातील सरकारी शाळा केवळ आर्थिकदृष्ट्या नसून त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे शैक्षणिकदृष्ट्या अन्यायकारक आणि टिकाऊ नाहीत. याचा परिणाम केवळ अपुरे अध्यापन-शिक्षणच नाही तर अधिक महत्त्वाचा म्हणजे बहुतेक ग्रामीण मुलांसाठी उप-इष्टतम आणि असमान शालेय अनुभव आहे जे नंतर एकतर महाविद्यालयीन प्रवेशासाठी पुरेशी तयारी करत नाहीत किंवा पदवीधर होणे कठीण आहे. संपूर्ण मानवी क्षमता प्रस्थापित करणे, न्याय्य व न्याय्य समाजाचा विकास करणे हा शिक्षणाचा उद्देश असल्याचा दावा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण करत असले तरी ग्रामीण भागातील उपेक्षित लोकसंख्येचा विचार करण्यात ते अपयशी ठरले आहे.

धोरणाचा दावा आहे की ते शिक्षण न्याय्य, परवडणारे बनवेल परंतु त्यात काही मूलभूत धोरणे आहेत ज्यात ग्रामीण आणि शहरी भागांमधील विभाजन वाढवण्याची उच्च शक्यता आहे. तंत्रज्ञानाचा अतिवापर हे त्या मूलभूत तत्त्वांपैकी एक आहे. या महामारीच्या परिस्थितीत ऑफलाइन ते ऑनलाइन पद्धतीत बदल केल्यामुळे हजारो विद्यार्थी आधीच शिक्षण घेण्यापासून वंचित राहिले आहेत. हे धोरण देशात अस्तित्वात असलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराच्या आधारावर विभागणी न करता ऑनलाइन पद्धतीवर भर देते. हे धोरण शिक्षणातील सार्वजनिक निधी काढून घेण्यास आणि खाजगी सहभागास प्रोत्साहन देते, यामुळे गरीब आणि उपेक्षित लोकसंख्येचा शिक्षणाचा अधिकार हिरावला जाऊ शकतो आणि शिक्षण केवळ विशेषाधिकारप्राप्त वर्गासाठी उपलब्ध असू शकते. या धोरणात प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून घेण्याची शिफारस करण्यात आली आहे आणि या धोरणात मातृभाषा ही संज्ञा कुठेही परिभाषित केलेली नाही ज्यामुळे संदिग्धता निर्माण होते, शिवाय या धोरणामुळे संस्कृत शिकणे अनिवार्य केले जाते ज्यामुळे विद्यार्थ्यांवर जास्त ताण येतो.

नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट समतापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजाची स्थापना करण्याचे असले तरी, धोरणाच्या काही भागांनी ग्रामीण भारताच्या समस्येकडे दुर्लक्ष केले आहे. धोरण सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित करते परंतु ऑनलाइन शिक्षण प्रक्रिया गरीब आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवते.

दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्र सुधारण्यासाठी सरकार शिक्षणाच्या खाजगीकरणाचा दावा करत असताना, दारिद्र्यरेषेखालील बहुसंख्य लोकसंख्येसाठी ते अगम्य होईल, कारण प्रत्येक व्यक्ती भारतात खाजगी शिक्षण घेण्यास सक्षम नाही.

नवीन शैक्षणिक धोरण दर्जेदार शिक्षण देऊन अखंडता प्रस्थापित करण्याविषयी बोलत असताना भाषिक भाग लोकांमध्ये भाषेच्या आधारावर विभागणी निर्माण करतो. भाषेच्या तरतुदीमध्ये ते संस्कृत शिकणे अनिवार्य करते आणि त्यामुळे भाषिक वर्चस्व निर्माण होते.

नवीन शैक्षणिक धोरण देशाच्या विविध भागांमध्ये आढळलेल्या त्रुटींपासून मुक्त नाही कारण या तरतुदींमुळे संदिग्धता निर्माण होते आणि अंमलबजावणीपूर्वी धोरणात स्पष्टता आणण्यासाठी तरतुदींचे पुनरावलोकन करणे आणि त्यावर काम करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने ते समजून घेतले पाहिजे.

**प्रा. डि. सि. कुरुमकर**
प्राचार्य श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय

# राज्यशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

महाविद्यालयातील उत्कृष्ट उपक्रम राबविणारा विभाग म्हणून राज्यशास विभाग ओळखला जातो. राज्यशास्त्र विषय महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु आहे विद्यार्थ्यांच्या पसंतीत राज्यशास विषय सतत अग्रेसर आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम वर्ष कला शाखेत ९६ द्वितीय वर्ष कला शाखेतील ११ विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र विषय निवडला आहे. तर तृतीय वर्षात १४ विद्यार्थी राज्यशास्त्र या विषयात शिक्षण घेतले. विभागांतर्गत कार्यक्रमः

**१. संविधान दिन :** राज्यशास्त्र विषयांतर्गत सविधान दिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. रविंद्र बनसोडे सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन करून संविधान शपथ सर्वांनी घेतली. कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक आध्यक्ष श्री राजीव फ्फराटे साहेब, सचिव मा. सौ मृणालताई राजीव फ्फराटे पाटील मॅडम या होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. प्रवीण कुरुमकर हे होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रा. गागुर्डे आर. बी यांनी केले.

**२. पोस्टर स्पर्धा :** राज्यशास्त्र विभागा अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून भित्तीपत्रक प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. भारतीय संविधान, राजकीय विच्यारवंतसमाज कार्य प्रेरणादायी भित्तीपत्रक साधर केली. या स्पर्धेत २२ विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला कार्यक्र माचे उद्घाटन प्राचार्य.प्रवीण कुरुमकर यांनी केले कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक आध्यक्ष श्री राजीव फराटे साहेब, सचिव मा.सौ. मृणालताई राजीव फ्फराटे पाटील मॅडम या होत्या. आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागाचे प्रा. गांगुर्डे रामदास भिमा यांनी केले.

**३. मतदान नोंदणी :** राज्यशास्त्र विभागच्याअंतर्गत 'महसूल सप्ताह युवा संवाद' कार्यक्रमअंतर्गत मतदान नोंदणी उपक्रम दिनांक रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. के. शितोळे सर व प्राध्यापक प्रवीण कुरुमकर तर प्रमुख अतिथी म्हणून मांडवगण फ्फराटा येथील तलाठी श्री. दीपक विठ्ठल गांगर्डे व श्री शुभम काळे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी मतदान नोंदणीसाठी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला व मांडवगण पराटा

परिसरात मतदान जागृती करून विद्यार्थी व परिसरातील नागरिकांचे मतदान नोंदणीकरण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. रमेश शितोळे सर यांनी केले तर प्रमुख अतिथी व

उपस्थितांचे आभार राज्यशास्त्र विभागाचे प्रा. गांगुर्डे आर. बी. यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकत्तेर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक आध्यक्ष श्री राजीव फ्फराटे साहेब, सचिव मा. सौ. मृणालताई राजीव फ्फराटे पाटील मॅडम या होत्या. आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागाचे प्रा. गांगुर्डे रामदास भिमा यांनी केले.

**४. राष्ट्रीय एकता दिवसः** राज्यशास्त्र विषया अंतर्गत राष्ट्रीय महा पुरुष सरदार वल्लभभाई पटेल

यांचा जन्मदिवस म्हणून राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील सर्व उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि सर्व प्राद्यापक व कर्मचारी यांनी राष्ट्रीय एक्याची शपथ घेऊन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजीव वसंतराव फ्फराटे पाटील साहेब, सचिव मा. सौ. मृणालताई राजीव फ्फराटे पाटील मॅडम होते. उपस्थितांचे आभार राज्यशास्त्र विभागाचे प्रा. गांगुर्डे आर.बी. यांनी केले.

**सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थी संख्या**

| अ.क्र. | वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला | ९६ |
| २. | द्वितीय वर्ष कला | ११ |
| ३. | तृतीय वर्ष कला | १४ |

**शैक्षणिक वर्षात प्राध्यापकांनी प्रकाशित केलेले पेपर.**

१. भारत आणि चीनच्या समग्र संबंधाचा अभ्यास राष्ट्रीय स्तरावर सादर व प्रकाशित देवळाली कॅम्प नाशिक.

२. भारतातील दहशतवाद आणि सद्यस्थितीतील परिणाम व उपाय योजना राज्य स्तरावर सादर जे. डी. सावंत महाविद्यालय.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता सामजिक व राजकीय परिवर्तनातील योगदान, राष्ट्रीय स्तरावरसादर.

४. शेतकरी आत्महत्या आणि राजकारण राज्य स्तरावर सादर, नाशिक. ता. दिंडोरी,

५. भारतीय स्त्री उन्नती विकास परिवर्तनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान.

६. आदिवासी समाजाच्या विकास परिवर्तनातील राजकीय भूमिकांचा अभ्यास.

७. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारताच्या महासत्ता निर्मितीतील एक प्रधान भूमिका.' राष्ट्रीय स्तरावर सादर.

८. भारत उद्याची महासत्ता एक सकारात्मक दृष्टिकोनाचा विश्लेषणात्मक अभ्यास राष्ट्रीय स्तरावर सादर ची.

Gangurde Ramdas Bhima. M.A. Bed, SET, PET, Ph D (Appeared) Research Paper

**Mr. Gangurde Ramdas Bhima.**
M.A. Bed, SET,PET, Ph D (Appeared)
Research Paper

| | |
|---|---|
| 1. Terrorism in India: Its Impacts & blution | International Emergent Research Journal P. No. 59 to 62 ISSN- 893-834X |
| 2. Study of Relations Between dia & China | International Emergent Research Journal P. No. 39 to 41 ISSN- 893-834X |
| 3. Farmers Suicides & Politics | International Emergent Research Journal P. No. 31 to 34 ISSN- 893-834X |
| 4. In socio-political transformation Contribution of Dr. Babasaheb Imbedkar to Joumalism. | Aadhar publications, Amaravati International joumal - ISSN |
| 5. A Study of Political Roles in ibal Society Development ansformation. | International journal of advance and applied research vol.4 ISSN 847-7075 |
| 6. Dr. Babasaheb Ambedkar's ontribution to Indian women's pliftment and development. | International journal of advance and applied research vol. 3 no-10 SN 2347-7075 |

विद्यापीठ कामकाजातील सह्राग प्रा. गागुर्डे रामदास भिमा.
१. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून काम केले.
२. यांची तृतीय वर्ष कला व एम. ए. प्रथम वर्ष कला या वर्गातील लोकप्रशान पेपर साठी सावित्रीबाई फ्फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या परीक्षा विभागाकडून पेपर सेटर म्हणून नियुक्ती झाली.
३. तृतीय वर्ष कला सेमिस्टर पाच व सहा ऑक्टोबर/ नोव्हेंबर आणि मार्च/ एप्रिल २०२२-२०२३ या कालावधीमध्ये पेपर चेकिंगचे काम केले.
४. प्रथम वर्ष कला, द्वितीय आणि तृतीय वर्ष कला या वर्गातील राजकीय विचाप्रणाली, पश्चिमात्य राजकीय विचारवंत, पत्रकारिता, आंतरराष्ट्रीय संबध लोकप्रशान पेपर साठी सावित्रीबाई फ्फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या बहिस्थ विभाग पेपर सेटर व लेक्चरर म्हणून नियुक्ती झाली.

**प्रा.गांगुर्डे रामदास भीमा**
(एम.ए.बी.एड,सेट,पेट,पीएच.डी..)
राज्यशास्त्र विभाग

# स्पर्धा परिक्षा विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा विभागातर्गत महाविद्यालयास विद्यापीठाने मान्यता दिलेल्या विविध योजना व उपक्रमांच्या अंमलबजावणीस महाविद्यालय नेहमीच तत्पर असते. चालू शैक्षणिक वर्षात स्पर्धा परीक्षातर्गत पुढील उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रवीण कुरुमकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे करण्यात आले.

**करीयर गाईड स्पर्धा परीक्षा.**

***यशस्वी जीवनाचा उत्तम मार्ग स्पर्धा परीक्षा.***

आपल्या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा विभागाअंतर्गत महाविद्यालयातील होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी विविध तज्ञ, आय. एस. अधिकारी, पोलीस निरीक्षक त्याचबरोबर विविध विभागातील स्पर्धा परीक्षेतून पुढे आलेले अधिकारी, तज्ञ मार्गदर्शकांचे व्याखाने वेळोवेळी आयोजित केले जाते. या स्पर्धा परीक्षा करीयर गाईड, कौशल्य व्याखानामध्ये गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचा लाभ होत आहे. महाविद्यालयातील हुशार, गुणवंत विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देतात.

स्पर्धा परीक्षा अंतर्गत करीयर गाईड आणि यशस्वी जीवनाचा उत्तम मार्ग स्पर्धा परीक्षा या विषयावर एक दिवसीय व्याख्यान दिनांक २२/०९/२०२३ आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अथिती व मार्गदर्शक म्हणून मा.श्री पराग जोशी आणि मा.श्री. विजय परदेशी यांनी विद्यार्थ्यांना विविध परीक्षांच्या माध्यमातून आपल्या भविष्यातील करीयर घडविण्यात आपण प्रशासनातील, सरकारी, निमसरकारी आणि आय.टी क्षेत्रांत अधिकारी बनण्याच्या उत्तम संधी कसी मिळविता येऊ शकते, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्व पटवून दिले.त्या करिता आपल्याकडे वेगवेगळे कौशल्य हवे आहे. विद्यार्थी, विद्यार्थिनी व्यवस्थापनाची आणि विविध कार्याची कौशल्य आत्मसात करून स्पर्धा परीक्षा देण्याचे आव्हान केले जाते. या वेळी महाविद्यालयातील १०८ विद्यार्थी, विद्यार्थि आणि प्राद्यापक व कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख प्रा. रामदास गांगुर्डे यांनी उपस्थितांचे आभार मानले. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यालयीन स्टाफ्फ व सहकारी प्राध्यापक, प्रध्यापाकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी विद्यार्थी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**प्रा. गागुर्डे रामदास भिमा**
(एम.ए.बी.एड, सेठ, पेट, पीएच.डी..)
स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख.

# सांस्कृतिक विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सांस्कृतिक विभागांतर्गत यशस्वीरीत्या पार पडलेले कार्यक्रम खालील प्रमाणे

| अ.नं. | कार्यक्रमाचे नाव | दिनांक | अध्यक्ष | व्याखाते |
|---|---|---|---|---|
| १) | स्वातंत्र्यदिन | १५ ऑगस्ट २०२२ | मा.श्री. ज्ञानेश्वर फराटे पाटील | मा.श्री.ज्ञानेश्वर फराटे पाटील |
| २) | शिक्षक दिन | ५ सप्टेंबर २०२२ | प्राचार्य प्रविण कुरूमकर | प्राचार्य प्रविण कुरूमकर |
| ३) | नवीन विद्यार्थी स्वागत समारंभ | १८ ऑक्टोंबर २०२२ | सौ.मृणालताई फराटे पाटील | सौ.मृणालताई फराटे पाटील |
| ४) | सावित्रीबाई फुले जयंती | ३ जानेवारी २०२३ | प्राचार्य प्रविण कुरूमकर | प्राचार्य प्रविण कुरूमकर |
| ५) | राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी २०२३ | प्राचार्य प्रविण कुरूमकर | प्राचार्य प्रविण कुरूमकर |
| ६) | प्रजाकसत्ता दिन | २६ जानेवारी २०२३ | मा.श्री. ज्ञानेश्वर फराटे पाटील | मा.श्री.ज्ञानेश्वर फराटे पाटील |
| ७) | शिवजयंती | १९ फेब्रुवारी २०२३ | मा.श्री.राजीव फराटे पाटील | मा.श्री.राजीव फराटे पाटील |
| ८) | जागतिक महिला दिन | ८ मार्च २०२३ | प्राचार्य प्रविण कुरूमकर | प्राचार्य प्रविण कुरूमकर |
| १) | महात्मा फुले जयंती | १४ एप्रिला २०२३ | मा.श्री.राजीव फराटे पाटील | मा.श्री.राजीव फराटे पाटील |

पुढारी

# राजमाता जिजाऊंचा आदर्श ठेवा

मांडवगण फराटा : राजमाता जिजाऊ यांनी केवळ शिवबांनाच घडवले नाही तर असंख्य महिलांना त्यांनी प्रेरणा दिली. आजही महिला मुलांना घडवताना राजमाता जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतात. स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण यासाठी प्रयत्न करणाऱ्या राजमाता जिजाऊ जगभरातील माता- भगिनींसाठी आदर्श आहेत, असे मत प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व विवेकानंद जयंती साजरी केली, या वेळी प्राचार्य बोलत होते. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य विजय भांड, कला विभा प्रमुख सुरेखा देशमुख, बी.सी.ए. विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. रमेश शितोळे, प्रा. शीतल मैंद, प्रा. रेश्मा मोटे, प्रा. अक्षया मोरे, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा. शरद शिंदे, प्रा. अनिल भिसे, सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

My Gramin Edition
Jan 15, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

सकाळ



मांडवगण फराटा (ता. शिरूर) : फराटे पाटील महाविद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना अभिवादन करताना मान्यवर.

## 'जिजाऊ असंख्य महिलांचे प्रेरणास्थान'

**मांडवगण फराटा :** "राजमाता जिजाऊ यांनी केवळ शिवबांनाच घडवले नाही तर असंख्य महिलांना प्रेरणा दिली. आजही मुलांना घडविताना जिजाऊंचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे. स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण यासाठी प्रयत्न करणाऱ्या जिजाऊ जगभरातील माता-भगिनींसाठी आदर्श आहेत. तसेच स्वामी विवेकानंद यांचे विचार आजच्या तरुणांनी आत्मसात करून आपल्या जगण्याला दिशा देणे गरजेचे आहे. स्वामी विवेकानंद यांचे जीवन व कार्य हे भारतीय तरुणांना प्रेरणा देते," असे प्रतिपादन प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी केले. ते वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रमात बोलत होते. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य विजय भांड, सुरेखा देशमुख, प्रा. बाळासाहेब तावरे, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. रमेश शितोळे, प्रा. शीतल मैंद, प्रा. रेश्मा मोटे, प्रा. अक्षया मोरे, प्रा. दत्तात्रेय पवार, प्रा. शरद शिंदे, प्रा. अनिल भिसे उपस्थित होते.

Pune, District-Today
13/01/2023 Page No. 3

## पिंपळसुटीत स्वच्छता, लोकसहभागाचा जागर

**मांडवगण फराटा, दि.७ (वार्ताहर)** - पिंपळसुटी (ता. शिरूर) येथे श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते दादा पाटील औषधनिर्माण महाविद्यालय यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिरात स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता करून जनजागृती केली.

विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छतेबरोबर स्त्रीभ्रूणहत्या, पर्यावरण जनजागृती, झाडे लावा झाडे जगवा, लेक वाचवा लेक शिकवा, अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर जनजागृती केली. ग्रामपंचायत, विकास सहकारी सोसायटी, सार्वजनिक सभामंडप, मंदिरे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, न्यू इंग्लिश स्कूल परिसरात स्वच्छता केली. शिबिरात प्रा. दिनेश पवार यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांचे योगदान या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील फलके, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष भाऊसाहेब खळदकर, ग्रामपंचायत सदस्य प्रदीप कापरे, माजी सरपंच ऋषीकांत फराटे, शशिकांत वेताळ, सरपंच नितीन फलके, नितीन भोसले, राजेंद्र कापरे, अमोल चव्हाण, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक उत्तम कांबळे, न्यू स्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी आडगळे, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्रा. जयराम पवार, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडधे उपस्थित होते.

प्रभात PuneDistrict, 08 Jan 2023, https://epaper.dainikprabhat...

राष्ट्र सह्याद्री 08 Jan 2023 - 08 Jan 2023 - Page 6

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वृक्षारोपण मोहीम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मांडवगण फराटा :** पिंपळसुटी (ता.शिरूर) येथे श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री दादापाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिरात माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

यावेळी बोलताना मृणाल फराटे म्हणाल्या की, वातावरणात सातत्याने बदल होत आहे त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. पर्यावरणाचा प्रश्न सर्व जगाला भेडसावत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन ही आजच्या काळाची मोठी गरज आहे व निसर्ग मानवाला खूप काही देत असतो याची जाण ठेवून, निसर्गाचं देणं आहे या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी आपापल्या क्षेत्रात वृक्षारोपण करून किमान एक तरी झाड लावावे केले असे आवाहन फराटे यांनी केले.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, माजी उपसरपंच महादेव आबा फराटे, बबन लगड, सरपंच नितीन फलके, ऋषिकांत फराटे, माजी सरपंच भाऊसाहेब पंडित, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनिल फलके, भाऊसाहेब खळदकर, उपसरपंच दत्तात्रय ठोंबरे, लखन कापरे ,रोहन वेताळ, मुख्याध्यापक उत्तम कांबळे, काकासो मोहिते, संतोष कौठाळे, संतोष कोकरे, भरतराव कदम, माणिक थोरात, तुषार फलके, बाळासाहेब ठोंबरे, दिलीप नागवडे, ग्रामसेविका सुनिता बोरुडे, प्राचार्य प्रविण कुरुमकर, प्राचार्य डॉ.हेमंत कांबळे, प्राचार्य डॉ.विवेक सातपुते, कार्यक्रम अधिकारी प्रा जयराम पवार, प्रा.सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडधे, प्रा.सुरेखा देशमुख, प्रा.शरद शिंदे, प्रा.विवेक जगताप, प्रा.अक्षया मोरे उपस्थित होते.

सकाळ

# श्रमसंस्कार शिबिरांत शिकण्याची संधी

## मृणाल फराटे पाटील यांचे प्रतिपादन; पिंपळसुटी येथे विविध उपक्रम

मांडवगण फराटा, ता. ७ : "सेवा आणि त्याग हे शब्द युवकांना आयुष्यातील सेवेचे महत्त्व विशद करतात. शिक्षण घेतानाच तरुणांवर सेवासंस्कार व्हावा, त्यांच्याकडून राष्ट्रसेवा घडावी, युवकांतील उर्जेचा उपयोग व्हावा, त्यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात श्रमसंस्कार शिबिरातून खूप काही शिकण्याची संधी असते. शिबिरात विद्यार्थ्यांना विविध सुप्त कलागुणांना अभिव्यक्त सादर करण्याची संधी असून समाजकारण व कलाविकासासाठी श्रमसंस्कार शिबिर एक उत्कृष्ट व्यासपीठ आहे," असे प्रतिपादन श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या सचिव मृणाल फराटे पाटील यांनी केले.



पिंपळसुटी (ता. शिरूर) : फराटे पाटील महाविद्यालयाच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात बोलताना मृणाल फराटे पाटील.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोकनेते श्री दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या वतीने 'युवकांचा ध्यास ग्रामविकास व शहर विकास' या उपक्रमांतर्गत पिंपळसुटी (ता. शिरूर) येथे २८ डिसेंबर ते ३ जानेवारीदरम्यान हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन केले होते. त्याच्या समारोप समारंभात मृणाल फराटे पाटील या बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नानासाहेब फलके होते. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, विष्णुदेव कांबळे, सुनील फलके, जालिंदर मोहिते, ऋषीकांत फराटे, बबन खळदकर, दत्तात्रय वेताळ गुरुजी, बबन लगड, संभाजी फराटे, सरपंच नितीन फलके, दत्तात्रय फराटे, भास्कर थोरात, अशोक फराटे, भाऊसाहेब खळदकर, भाऊसाहेब पंडित, विलास फलके, दिलीप निंबाळकर, पंडित मोहिते, जालिंदर मोहिते, संजय थोरात, प्रदीप कापरे, ग्रामसेविका सुनीता बोरुडे, उत्तम कांबळे, दत्तात्रेय ठोंबरे, लखन कापरे, रोहन वेताळ, दत्तात्रय पवळे, मारुती पवळे, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य डॉ. विवेक सातपुते, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडधे आदी उपस्थित होते.

### शिबिरातून जनजागृती

- राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार यांनी सात दिवसांत केलेल्या कामाची माहिती दिली. ग्रामस्वच्छता अभियान, वृक्षारोपण, पथनाट्यातून जनजागृती, महिला जनजागृती, झाडे लावा झाडे जगवा, लेक वाचवा लेक शिकवा, ग्रामसर्वेक्षण, पर्यावरण जनजागृती, कोरोना जनजागृती तसेच विविध मान्यवरांच्या व्याख्यानांचे आयोजन केले होते.

Pune, District-Today
08/01/2023 Page No. 8

समर्थ भारत
रविवार, दि. ८ जानेवारी २०२३ ३

# पिंपळसुटी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची सांगता उत्साहात

## फराटे पाटील महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न



### शिक्षणातून सेवासंस्कार व्हावा

### विविध व्याख्यानांचे आयोजन

लोकमत



पिंपळसुटी (ता. शिरूर) येथे श्रमसंस्कार शिबिराची सांगता करण्यात आली.

# पिंपळसुटी येथील शिबिराची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

रांजणगाव सांडस : पिंपळसुटी (ता. शिरूर) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री दादापाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रमसंस्कार शिबिराची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व महात्मा गांधी यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नानासाहेब गुलाबराव फलके होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार यांनी गावामध्ये सात दिवसांत केलेल्या कामाची माहिती दिली. ग्रामस्वच्छता अभियान, वृक्षारोपण, पथनाट्यातून जनजागृती, महिला जनजागृती, झाडे लावा झाडे जगवा, लेक वाचवा लेक शिकवा, जनजागृती तसेच विविध मान्यवरांची व्याख्याने पार पडली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, ग्रामसेविका सुनिता बोरुडे, मुख्याध्यापक उत्तम कांबळे, विष्णुपंत वाबळे, सुनील फलके, जालिंदर मोहिते, कमीकांत फराटे, बबन खळदकर, हभप दशरथ वेताळ गुरुजी, बबन लगड, संभाजी फराटे, सरपंच नितीन फलके, दशरथ फराटे, भास्कर थोरात, अशोक फराटे, भाऊसाहेब खळदकर, भाऊसाहेब पंडित, विलास फलके, दिलीप निंबाळकर, पंडित मोहिते, जालिंदर मोहिते, संजय थोरात, प्रदीप कापरे, दत्तात्रय ठोंबरे, लखन कापरे, रोहन वेताळ, दशरथ पारखे, मारुती पारखे, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, डॉ. हेमंत कांबळे, डॉ. विवेक सातपुते, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गढवे उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 12 Jan 07, 2023

राष्ट्र सह्याद्री 05 Jan 2023 - 05 Jan 2023 - Page 6

# पिंपळसुटी येथे प्रभातफेरी व पथनाट्याच्या माध्यमातुन समाजप्रबोधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



मांडवगण फराटा : येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री दादापाटील औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीरादरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळसुटी आणि न्यू इंग्लिश स्कूल पिंपळसुटी यांच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून ग्रामस्वच्छता अभियान पथनाट्य सादर करून जनजागृती केली.

या वेळी स्वच्छता मोहिमेत विद्यार्थ्यांनी गावातील अंगणवाडी, ग्रामपंचायत, मंदिर, स्मशानभूमी, प्राथमिक शाळा, संपूर्ण गाव स्वच्छ करून गावातील कचरा, सांडपाणी इत्यादी स्वच्छता करून गाव स्वच्छ व सुंदर केले.

त्याच बरोबर विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीच्या माध्यमातून झाडे लावा झाडे जगवा, लेक वाचवा लेक शिकवा, स्वच्छ भारत स्वस्थ भारत, पर्यावरण जनजागृती, व्यसनमुक्ती, महिला जनजागृती, प्रदूषण हटवा पर्यावरण वाचवा अशा विविध विषयावर जनजागृती केली. यावेळी भाऊसाहेब पंडित, सुनील फलके, भाऊसाहेब खळदकर, कमीकांत फराटे, रोहन वेताळ, मुख्याध्यापक उत्तम कांबळे, वाबळे, प्राचार्य प्रविण कुरुमकर, प्रा. डॉ हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, कार्यक्रम अधिकारी प्रा जयराम पवार, प्रा. सोनाली म्हेत्रे प्रा. विकास गढवे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पिंपळसुटीत समाजप्रबोधनाचा जागर; श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ



प्रभात

लोकमत



मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील फराटे पाटील महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.

# थोरांचे विचार आत्मसात करण्याची गरज : कुरुमकर

## फराटे महाविद्यालयात विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

रांजणगाव सांडस : राजमाता जिजाऊ यांनी केवळ शिवबांनाच घडवले नाही तर असंख्य महिलांना प्रेरणा दिली. आजही महिला मुलांना घडवताना राजमाता जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवतात. स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण यासाठी प्रयत्न करणाऱ्या राजमाता जिजाऊ जगभरातील माता-भगिनींसाठी आदर्श आहेत.

तसेच स्वामी विवेकानंद यांचे विचार आजच्या तरुणांनी आत्मसात करून आपल्या जगण्याला दिशा देणे गरजेचे आहे. स्वामी विवेकानंद यांचे जीवन व कार्य हे भारतीय तरुणांना प्रेरणा देईल, असे मत प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी व्यक्त केले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणालताई फराटे पाटील, प्राचार्य विजय भांड, सुरेखा देशमुख, बीसीए विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. रमेश शितोळे, प्रा. शीतल मैंद, प्रा. रेश्मा मोटे, प्रा. अक्षया मोरे, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा. शरद शिंदे, प्रा. अनिल भिसे उपस्थित होते.

### जिजाऊ जयंती साजरी

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.

Hello Pune Gramin
Page No. 10 Jan 13, 2023
Powered by: erelego.com

**लोकमत**

# पिंपळसुटीत पथनाट्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** पिंपळसुटी येथे श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते श्री दादा पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून जनजागृती केली. या वेळी स्वच्छता मोहिमेत विद्यार्थ्यांनी गावातील अंगणवाडी, ग्रामपंचायत, मंदिरे, स्मशानभूमी, प्राथमिक शाळा, संपूर्ण गाव स्वच्छ करून गावातील कचरा, सांडपाणी इत्यादी स्वच्छता करून गाव स्वच्छ व सुंदर केले. लेक वाचव लेक शिकवा, स्वच्छ भारत स्वस्थ भारत, पर्यावरण जनजागृती व्यसनमुक्ती विविध विषयांव जनजागृती केली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील भाऊ पंडित, सुनील फलके, रोहन वेताळ, उत्तम कांबळे, प्राचार्य प्रवीण कुरूमकर, प्रा. डॉ. हेमंत कांबळे प्राचार्य विवेक सातपुते, कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडधे, सर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**पुढारी**

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत श्रमसंस्कार शिबिराचे योगदान : ज्ञानेश्वर फराटे पाटील

**मांडवगण फराटा : पुढारी वृत्तसेवा**



पिंपळसुटी (ता.शिरूर) येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटनप्रसंगी बोलताना संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील. (छाया : राजेंद्र बहिरट)

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत श्रमसंस्कार शिबिराचे मोठे योगदान आहे. त्यातून चांगला माणूस घडविला जातो, असे प्रतिपादन वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील यांनी केले.

पिंपळसुटी (ता.शिरूर) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते दादा पाटील फराटे पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय तसेच फराटे पाटील फार्मसी डिप्लोमा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

सात दिवसांच्या या शिबिरात ग्रामस्वच्छता, महिला जनजागृती, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या, मोबाईलचा अतिवापर, ग्रामस्वच्छता, झाडे लावा झाडे जगवा, लेक वाचवा लेक शिकवा याबाबत पथनाट्यांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले जाते. या उपक्रमातून श्रमाबरोबरच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली जातात. यातूनच सर्वांगीण माणूस घडविला जातो, असे ज्ञानेश्वर फराटे पाटील यांनी सांगितले. संस्थेचे सचिव मृणाल फराटे पाटील म्हणाले की, फराटे पाटील शैक्षणिक संकुलाच्या वतीने गेली अनेक वर्षे परिसरात शिबिराचे आयोजन केले आहे. त्यातून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड झाल्याने परिसराचा कायापालट झाला. वनराई बंधारे बांधण्यात आल्याने परिसरातील पाण्याची पातळी वाढली. संस्थेलादेखील या कामांचा अभिमान आहे. या वेळी संभाजी यशवंत फराटे, नितीन फलके, बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार, वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, घोडगंगा कारखान्याचे माजी संचालक शशिकांत वेताळ, माजी सरपंच नानासाहेब फलके, ऋषिकांत फराटे, भाऊसाहेब पंडित आदींसह प्राचार्य प्रवीण कुरूमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, कार्यक्रम अधिकारी जयराम पवार, सोनाली म्हेत्रे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रमेश शितोळे यांनी केले. विकास गडधे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Jan 2, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

**पुढारी**



मांडवगण फराटा येथील फराटे पाटील महाविद्यालयात रा.से.यो. दिवस उत्साहात साजरा झाला.

## मांडवगण फराटा येथे रा.से.यो. दिन

**मांडवगण फराटा :** मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. प्रा. दिनेश पवार यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास तसेच महाविद्यालय आणि समाज विकासासाठी आवश्यक मूल्य या योजनेच्या माध्यमातून रुजवली जातात, असे सांगितले. प्राचार्य प्रवीण कुरूमकर यांनी नम्रपणा, विनयशीलता, श्रमनिष्ठ या गुणांनीच रा.से.यो.स्वयंसेवक स्वयंपूर्ण होतो, असे सांगितले. कार्यक्रम अधिकारी जयराम पवार यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाच्या विभागास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मिळालेल्या पुरस्कारांच्या गौरवपत्रांचीही माहिती दिली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणालताई फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील आदींसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

My Gramin Edition
Sep 25, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

**पुढारी**

# फराटे पाटील महाविद्यालयात व्याख्यानमाला

**मांडवगण फराटा : पुढारी वृत्तसेवा**

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष अंतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ह. भ. प. विशाल महाराज फलके यांचे 'विद्यार्थी दशा व दिशा' या विषयावर व्याख्यान झाले.

या व्याख्यानमालेची सुरुवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीताने झाली. या व्याख्यानमालेप्रसंगी ह.भ.प. विशाल महाराज फलके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संतांची व महापुरुषांची कर्तृत्वाची वेगवेगळी उदाहरणे देऊन त्यांचे विचार आचरणात कशाप्रकारे आणावे, वाढीच्या वयात भराभर विद्या शिकून माणसाने जगातील आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यास सिद्ध व्हावे व विद्यार्थ्याने कसे आदर्श जीवन जगावे, याबाबत मार्गदर्शन केले. यासोबतच आई-वडिलांचा व गुरुजनांचा आदर करणे हे आपले परमकर्तव्य आहे, असे मौलिक विचार त्यांनी मांडले.

अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य प्रवीण कुरूमकर यांनी 'विद्या विनयन शोभते' या वाक्यातील अर्थ समजावून सांगितला व विद्यार्थी यांनी सर्वगुण संपन्न कसे राहता येईल, यासाठी विविध कलांना वाव द्यावा, असे सांगितले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे, संस्थापक सचिव मृणालताई फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरूमकर, बहि:शाल शिक्षण मंडळ केंद्रवाहक सुरेखा देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. जयराम पवार, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. रमेश शितोळे, बीसीए विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. शरद शिंदे आदींसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन प्रा. रमेश शितोळे यांनी केले. प्रा. शीतल मैंद यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Dec 26, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

**प्रभात** पुणे, रविवार, दि. १६ ऑक्टोबर २०२२

# डॉ. कलामांची स्वप्नपूर्ती तरुणांकडे - राजीव फराटे पाटील

**मांडवगण फराटा, दि. १५ (वार्ताहर)** - डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न हे तरुणांच्या जीवावरच पाहिले होते. २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल, असे मत डॉक्टर कलाम यांनी व्यक्त केले होते. कारण देशातील तरुणांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या. डॉक्टर कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल, असे मत राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी व फराटे पाटील कॉलेज ऑफ डी फार्मसी महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ व शिरूर तालुका पत्रकार संघाच्या वतीने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. सुरेखा देशमुख यांनी मार्गदर्शन केले. प्रा. जयराम पवार, प्रा. प्रतीक्षा कोठारी, सविता निकम यांनीही मते मांडली. यावेळी पत्रकार राजेंद्र बहिरट, प्रमोल कुसेकर, वितरक प्रशांत चौधरी उपस्थित होते. प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, प्राचार्य संदीप कोकरे, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. गणेश खोडवे, प्रा. ए. एस. थोरात, प्रा. आर. व्ही. पवार, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडदे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. अविनाश ढोबळे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रमेश शितोळे यांनी केले तर प्रा. विकास गडदे यांनी आभार मानले.

# विवाहपूर्व समुपदेशन काळाची गरज - डॉ. दीपाली जाधव

**मांडवगण फराटा, दि. २४ (वार्ताहर)** - विवाहपूर्व समुपदेशन ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते डॉ. दीपाली जाधव यांनी केले.

येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने आजीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत विवाहपूर्व समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यशाळेची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांमध्ये स्त्री-पुरुष समानता व वैवाहिक कायदेशीर बाबींची जाणीव निर्माण केली पाहिजे. वैवाहिक समायोजन आणि लैंगिक शिक्षण, विवाहपूर्वी समुपदेशानाची गरज दिवसेंदिवस वाढत चाललीय. वरवरच्या आकर्षणापलीकडे समोरच्याचे व स्वतःचेही गुण-दोष डोळसपणाने तपासून पहावे. स्त्री ही समाजाची निर्माती आहे, मुलींनी आर्थिक सक्षम होऊन आत्मबळ वाढवले पाहिजे, यासाठी प्राणायामाचे महत्व देखील पटवून दिले. संस्थेच्या सचिव मृणाल फराटे पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, डॉ. सुरेश जगताप, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य डॉ. विवेक सातपुते उपस्थित होते. प्रा. जयराम पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रमेश शितोळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सोनाली म्हेत्रे यांनी आभार मानले.

**प्रभात** PuneDistrict, 25 Feb 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# फराटे पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**मांडवगण फराटा, दि. ५ (वार्ताहर)**- येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त करण्यात आले.

यावेळी विविध उपक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या. प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, बीसीए विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, बीसीएस विभागप्रमुख प्रा. निनाद पाडळे, कला विभाग प्रमुख प्रा. सुरेखा देशमुख, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सोनाली म्हेत्रे, कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा. रमेश शितोळे, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन वैशाली मिठे व आभार नम्रता निगडे यांनी मानले.



**मांडवगण फराटा :** श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

राज्य

**सकाळ**

# मांडवगण येथील महाविद्यालयात डॉ. कलाम यांच्या कार्याची माहिती

**मांडवगण फराटा, ता. १७ :** डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी तरुण पिढीने घेतली पाहिजे. त्यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न पाहिले होते. देशातील तरुणांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या. डॉ. कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल, असे मत राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा येथील श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी व फराटे पाटील कॉलेज ऑफ डी. फार्मसी या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ व शिरूर तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा केला. यावेळी फराटे बोलत होते. प्रा. सुरेखा देशमुख यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या प्रसंगी प्रा. जयराम पवार, प्रा. प्रतीक्षा कोठारी, सविता निकम यांची भाषणे झाली. यावेळी प्रवीण कुरुमकर, डॉ. हेमंत कांबळे, विवेक सातपुते, संदीप कोकरे, संतोष वाघमारे, गणेश खोडवे, थोरात ए. एस., आर. व्ही. पवार, सोनाली म्हेत्रे, विकास गडदे, रमेश शितोळे, अविनाश ढोबळे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश शितोळे यांनी केले. तर विकास गडदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Pune, District-Today
18/10/2022 Page No. 7

पुढारी

# राजमाता जिजाऊंचा आदर्श ठेवा

मांडवगण फराटा : राजमाता जिजाऊ यांनी केवळ शिवबांनाच घडवले नाही तर असंख्य महिलांना त्यांनी प्रेरणा दिली. आजही महिला मुलांना घडवताना राजमाता जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतात. स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण यासाठी प्रयत्न करणाऱ्या राजमाता जिजाऊ जगभरातील माता- भगिनींसाठी आदर्श आहेत, असे मत प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व विवेकानंद जयंती साजरी केली, या वेळी प्राचार्य बोलत होते. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य विजय भांड, कला विभा प्रमुख सुरेखा देशमुख, बी.सी.ए. विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. रमेश शितोळे, प्रा. शीतल मैंद, प्रा. रेश्मा मोटे, प्रा. अक्षया मोरे, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा. शरद शिंदे, प्रा. अनिल भिसे, सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

My Gramin Edition
Jan 15, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# डॉ. कलामांच्या चरित्रातून तरुणांना मिळेल दिशा

मांडवगण फराटा : पुढारी वृत्तसेवा

माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न हे तरुणांच्या विश्वासाने पाहिले होते. २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल, असे भाकित डॉ. कलाम यांनी व्यक्त केले होते. कारण देशातील तरुणांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या. तसेच डॉ. कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल, असे मत संस्थेचे अध्यक्ष राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

**राजीव फराटे पाटील यांचे मत**



मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील फराटे पाटील शैक्षणिक संकुलात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आला.

ते मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी व फराटे पाटील कॉलेज ऑफ डी फार्मसी या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ व दै. 'पुढारी' यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणून प्रा. सुरेखा देशमुख यांनी मत व्यक्त करताना डॉ. कलाम यांचे व्यक्तीचरित्र व त्यांनी देशासाठी केलेले कार्य यावर विचार मांडले. प्रा. जयराम पवार, प्रा. प्रतीक्षा कोठारी तसेच विद्यार्थी सविता निकम यांनीही आपली मते मांडली. यावेळी मांडवगण फराटा येथे गेले ३५ वर्षांपासून पेपर विकण्याचे काम करणारे प्रमोद चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, प्राचार्य संतोष घोकरे तसेच ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. गणेश खोडवे, प्रा. ए. एस. भोसले, प्रा. आर. व्ही. पवार, रसेयोच्या प्रा. सोनाली मोते, प्रा. विकास गाढे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. अविनाश डोंबळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. रमेश शितोळे यांनी केले, तर प्रा. विकास गाढे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

My Gramin Edition
Oct 16, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# फराटे पाटील शैक्षणिक संकुलात हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मांडवगण फराटा :** येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच श्री दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवगण फराटा यांच्या संयुक्त. विद्यमाने 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या योजनेअंतर्गत हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंजुषा सातपुते यांनी उपस्थित विद्यार्थीनीना युवतींचे 'आरोग्यः समस्या व उपाय' या विषयावर मार्गदर्शन केले. युवतींना उद्भवणाऱ्या रक्तक्षय, रक्तदाब, वाढते वजन व ताण-तणाव यातून येणारा अशक्तपणा याबद्दल घ्यायची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. हांडे



यांनी घरातील स्त्रीचे आरोग्य समजावून सांगताना कुटुंबातील महिला आरोग्याचे महत्व विषद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील म्हणाल्या की, 'आज प्रत्येक युवतीचा कल हा सकस आहार घेण्यापेक्षा फास्ट फुड घेण्याकडे असल्याचे जाणवते. हे चुकीचे असून सकस आहार घेतला तर शरीर सुदृढ राहते व तान तणाव कमी होतो म्हणून विद्यार्थीनींनी आपल्या आरोग्याची काळजी घेत असताना आहाराविषयी देखील सतर्क रहावे तसेच निरोगी शरीरात निरोगी मन रहाते असे फराटे म्हणाल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रविण कुरुमकर यांनी प्रास्तविक करताना महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रविण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे ,प्राचार्य विवेक सातपुते, एम फार्म. समन्वयक संतोष बाघमारे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. शरद शिंदे सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या शिबीर कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. जयराम पवार यांनी केले व आभार प्रा. सोनाली म्हेत्रे यांनी मानले.

लोकमत

# फराटे पाटील शैक्षणिक संकुलात आरोग्य शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच श्री. दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंजुषा सातपुते यांनी उपस्थित विद्यार्थिनींना 'युवतींचे आरोग्य : समस्या व उपाय' या विषयावर मार्गदर्शन केले.



श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित आरोग्य शिबिरात उपस्थित मान्यवर.

राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, मांडवगण- फराटा यांच्या वतीने 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या योजनेतर्गत हे शिबिर घेण्यात आले. यामध्ये युवतींना उद्भवणाऱ्या रक्तक्षय, रक्तदाब, वाढते वजन व तणावामुळे वाढून येणारा अशक्तपणा या बद्दल घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. हांडे यांनी घरातील स्त्रीचे आरोग्य समजावून सांगताना कुटुंबातील महिला आरोग्याचे महत्त्व विषद केले. अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील म्हणाल्या, आज प्रत्येक युवतीचा कल फास्टफूडकडे असतो. हे चुकीचे असून सकस आहार घेतला तरच शरीर सुदृढ राहते. तणावाव कमी होतो म्हणून विद्यार्थिनींनी आपल्या आरोग्याची काळजी घेत असताना आहाराविषयीदेखील सतर्क राहावे. तसेच निरोगी शरीरात निरोगी मन राहते, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

प्रास्ताविक प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कोकडे, प्राचार्य विवेक सातपुते, एम.फार्म. समन्वयक संतोष वायभासे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा. सोनाली म्हेत्रे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. शरद शिंदे सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. जयराम पवार यांनी केले व आभार प्रा. सोनाली म्हेत्रे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Oct 10, 2022
Powered by: erelego.com

लोकमत



फराटे पाटील महाविद्यालयात व्याख्यान देताना विशालमहाराज फलके.

# फराटे पाटील महाविद्यालयात व्याख्यानमालेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** मांडवगण फराटा येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक साह्यता कक्षअंतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ह.भ.प. विशाल महाराज फलके यांचे 'विद्यार्थी दशा व दिशा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

या व्याख्यानमालेची सुरुवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीताने झाली. या व्याख्यानमालाप्रसंगी ह.भ.प.विशाल महाराज फलके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संत व महापुरुषांच्या कर्तृत्वाची वेगवेगळी उदाहरणे देऊन त्यांचे विचार आचरणात आणण्याचा याचा प्रयत्न करावा, वाढत्या वयात भरभर विद्या शिकून माणसाने जगातील आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यास सिद्ध व्हावे, त्याचबरोबर विद्यार्थ्याने कसे आदर्शपूर्ण जीवन जगावे असे सांगितले.

> कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी विद्या विनयन शोभते या वाक्यातील अर्थ समजावून सांगितला व विद्यार्थ्यांनी सर्वगुणसंपन्न कसे राहता येईल, यासाठी विविध कलागुणांना वाव द्यावा, असे सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे, संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, बहि:शाल शिक्षण मंडळ केंद्रवाहक प्रा. सुरेखा देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. जयराम पवार, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. रमेश शितोळे, बीसीए विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. शरद शिंदे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन प्रा. रमेश शितोळे यांनी केले व आभार प्रा. शीतल मैंद यांनी आभार मानले.

# फराटे महाविद्यालयात 'विद्यार्थी दशा व दिशा' यावर व्याख्यानमाला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मांडवगण फराटा :** येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बहि:शाल शिक्षण मंडळ व जेष्ठ नागरीक सहाय्यता कक्ष अंतर्गत डॉ बाबासाहेब जयकर व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ह.भ.प.विशाल महाराज फलके यांचे विद्यार्थी दशा व दिशा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.या व्याख्यान मालेची सुरवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गीताने झाली.या व्याख्यान माले प्रसंगी ह.भ.प.विशाल महाराज फलके यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना संतांची व महापुरुषांची कर्तृत्वाची वेग वेगळी उदाहरणे देऊन त्यांचे विचार आचरणात कशा प्रकारे आणावे. याचे बहुमुल्य मार्गदर्शन करत जीवनात निराश न होता आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत हे ओळखून नवीन दिशा शोधण्याचा प्रयत्न करावा असे बोलताना फलके यांनी सांगितले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी विद्या विनयन शोभते या वाक्यातील अर्थ समजावून सांगितला व विद्यार्थी यांनी सर्वगुण संपन्न कसे राहता येईल या साठी विविध कलांना वाव द्यावा.



या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे, सचिव मृणाल फराटे पाटील,प्राचार्य प्रविण कुरुमकर,बहि:शाल शिक्षण मंडळ केंद्रवाहक सुरेखा देशमुख,राष्ट्रीय सेवा योजना, अधिकारी प्रा.जयराम पवार, बीसीए विभागप्रमुख प्रा.बाळासाहेब तावरे,वाणिज्य विभागप्रमुख प्रा.सोनाली म्हेत्रे,प्रा.शरद शिंदे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या व्याख्यान मालेचे सूत्रसंचालन प्रा.रमेश शितोळे यांनी केले व आभार प्रा.शितल मैंद यांनी मानून कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

Hello Pune Gramin

लोकमत

# फराटे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी राष्ट्रीय सेवा योजना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रवीण कुरुमकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दिनेश पवार लाभले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना गीताने झाली.

प्रा. दिनेश पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना नवी वाट, नवी दिशा, नवीन शोध व क्षमतांचा शोध देणारी माध्यम आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजना ही सतत कार्यरत असते असे मत व्यक्त केले. प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्काराबरोबर मूल्यही शिकविते. नम्रपणा विनयशीलता श्रमनिष्ठा या गुणांनी परिपूर्ण होऊनच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वयंपूर्ण होतो असे मत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी जयराम पवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला त्यात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. तसेच महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मिळालेल्या पुरस्कारांच्या गौरवपत्रांची ही माहिती दिली. विद्यापीठातील नावाजलेले एकक म्हणून या विभागाचा नावलौकिक आहे असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, रा. से. यो कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा. सोनाली म्हेत्रे, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रा. रमेश शितोळे यांनी सूत्रसंचालन केले व प्रा. सोनाली म्हेत्रे यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Sep 25, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# पिंपळसुटीत फराटे महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस :** पिंपळसुटी (ता. शिरूर) याठिकाणी श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व लोकनेते दादा पाटील फराटे पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय तसेच फराटे पाटील फार्मसी डिप्लोमा महाविद्यालय यांच्यावतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव युवकांचा ध्यास ग्रामविकास व शहर विकास या अभियानांतर्गत विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी यशवंत फराटे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन नितीन फलके, घोडगंगा कारखान्याचे माजी उपाध्यक्ष प्रकाश पवार, श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, संस्थापक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, माजी संचालक शशिकांत वेताळ, नानासाहेब फलके, ऋषिकांत फराटे, भाऊसाहेब पंडित, जातेगावचे सरपंच मासळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. रमेश शितोळे यांनी सूत्रसंचालन केले. विकास गडधे यांनी आभार मानले.



पिंपळसुटी येथे फराटे महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

### पथनाट्यातून समाजप्रबोधन

- या सात दिवसीय शिबिरात पथनाट्याच्या माध्यमातून समाजप्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार यांनी दिली.
- यावेळी भाऊसाहेब खळदकर, प्रदीप कापरे, सुनील फलके, किरण शितोळे, संदीप फलके, रामदास काळे, दत्ता फराटे, नवनाथ चव्हाण, बापूराव चव्हाण, अमोल चव्हाण, अशोक फराटे, नितीन भोसले, रोहन वेताळ, प्रशांत विधाते, रामभाऊ फलके, ग्रामसेवक सुनीता बोरुडे, मुकिंदा फराटे, राजेंद्र कापरे, पंडित मोहिते, सुभाष कापरे, सागर खळदकर, भाऊ खलाटे, ज्ञानदेव पारखे, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, कार्यक्रम अधिकारी जयराम पवार, प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडधे उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 4 Dec 29, 2022
Powered by: erelego.com



# छत्रपतींचा इतिहास हा जसा ढाल तलवारीचा आहे तसाच तो आत्मसन्मान व समाज परिवर्तनचा आहे. : डॉ. प्रकाश पांढरमिसे

समर्थ भारत वृत्तसेवा

### रयतेची काळजी घेणाराच खरा राजा

**राजा होण्यासाठी लढाया जिंकाव्याच लागतात परंतु लोककल्याणकारी जाणता राजा होण्यासाठी रयतेची पोटच्या लेकराप्रमाणे काळजी घ्यावी लागते. ती काळजी रयतेची छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतली होती. स्वराज्यातील रयतेच्या बारीक सारीक गोष्टींची जाण भान त्यांना होती म्हणूनच त्यांना 'जाणता राजा' ही सर्वात मोठी बिरुदावली बहाल केली होती. जगातील अनेक राष्ट्रांना हेवा वाटावा असा छत्रपती शिवाजी राजांचा इतिहास दैदिप्यमान व आदर्शवत असा आहे.**

मांडवगण फराटा, ता. १: पिंपळसुटी (ता. शिरूर )येथे श्री वसंतराव फराटे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व श्री दादापाटील फराटे औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख आणि इंदापूर तालुका राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. प्रकाश पांढरमिसे यांचे "छत्रपती शिवाजी महाराज व आजची तरुणाई " या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले कि , छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा जसा ढाल तलवारीचा आहे तसाच तो शौर्य, धैर्य, औदार्य, समता, न्याय, बंधुता, स्वाभिमानाचा आणि समाज परिवर्तनाबरोबरच आत्मसन्मानाचा आहे.

महापुरुषांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या साजऱ्या करताना वाद्यांचा गजर करण्यापेक्षा विचारांचा जागर करायला हवा. ध्वनी प्रदूषण, होर्डिंग आणि बॅनरबाजी न करता महापुरुषांनी सांगितलेल्या आदर्शवत विचार संस्काराचा जागर केला पाहिजे. असे मौलिक व प्रेरणादायी विचार आजच्या तरुणाईला डॉ. पांढरमिसे यांनी आपल्या ओघवत्या व झंझावाती शैलीत मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी व शिरूर तालुका विभागीय समन्वयक प्रा. जयराम पवार यांनी केले. या वेळी प्राचार्य प्रविण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा.सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडधे, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा. अनिल भिसे, प्रा. मिथील वाईगडे, प्रा. गणेश खोडवे, प्रा. प्रमिला चौगुले, प्रा.प्रतीक्षा कोठारी उपस्थित होते.

पुढारी

# विवाहपूर्व समुपदेशन ग्रामीणमध्येही हवे : जाधव

**मांडवगण फराटा : पुढारी वृत्तसेवा**

ग्रामीण भागात विवाह समुपदेशन अधिकाधिक प्रमाणात व्हायला हवे यासाठी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे मत डॉ. दीपाली जाधव यांनी व्यक्त केले.

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री. वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत विवाहपूर्व समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन केले होते. या प्रसंगी डॉ. जाधव बोलत होत्या.



विवाहपूर्व समुपदेशन कार्यशाळेत बोलताना डॉ. दीपाली जाधव.

विद्यार्थ्यांमध्ये स्त्री-पुरुष समानता व वैवाहिक कायदेशीर बाबींची जाणीव निर्माण केली पाहिजे. वरवरच्या आकर्षणापलीकडे समोरच्याचे व स्वत:चेही गुण-दोष डोळसपणाने तपासून पाहावे. विवाह समुपदेशन ग्रामीण भागात झाल्यास अनेक समस्या सोडविण्यात यश येईल, असेही त्या या वेळी म्हणाल्या. कौटुंबिक नातेसंबंध सुदृढ असणे हे भावनिक सुरक्षितता आणि स्थैर्यासाठी, मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे असते. त्यासाठी महाविद्यालयातच जनजागृती व्हायला हवी, असे मत संस्थेचे संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष राजीव फराटे पाटील, प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्रा.सुरेश जगताप, प्राचार्य डॉ.हेमंत कांबळे, प्राचार्य डॉ.विवेक सातपुते, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक आजीवन अध्ययन विस्तार विभाग समन्वयक प्रा.जयराम पवार यांनी केले.

My Gramin Edition
Feb 26, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# डॉ. कलमांच्या चरित्रातून तरुणांना दिशा मिळेल : राजीव फराटे

## फराटे पाटील शैक्षणिक संकुलात वाचन प्रेरणा दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस:** मांडवगण फराटा (ता. शिरूर) डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न हे तरुणांच्या जीवावरच पाहिले होते. २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल असे मत डॉ. कलाम यांनी व्यक्त केले होते कारण देशातील तरुणांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या तसेच डॉक्टर कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल ते मत राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी व फराटे पाटील कॉलेज ऑफ डी फार्मसी या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ व शिरूर तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला त्यानिमित्त ते बोलत होते.



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करताना मान्यवर.

प्रा. सुरेखा देशमुख यांनी डॉ. कलाम यांचे व्यक्ती चरित्र व त्यांनी देशासाठी केलेले कार्य यावर विचार मांडले. डॉ. कलाम यांना शास्त्रज्ञ म्हणून आपली ओळख दाखविण्यापेक्षा एक शिक्षक म्हणून ओळख दाखविण्यात अभिमान वाटत होता असेही त्या यावेळी म्हणाल्या.

प्रा. जयराम पवार, प्रा प्रतीक्षा कोठारी तसेच विद्यार्थिनी सविता निकम यांनीही आपली मते मांडली. यावेळी प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, प्राचार्य संदीप कोकरे एम फॉर्म विभाग समन्वयक प्रा. संतोष वाघमारे तसेच ग्रंथालय विभाग प्रमुख गणेश खोडवे, ए एस थोरात, आर. व्ही. पवार, जयराम पवार, सोनाली म्हेत्रे, विकास गडदे, रमेश शितोळे, अविनाश ढोबळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश शितोळे यांनी केले तर विकास गडदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Oct 16, 2022
Powered by: erelego.com

# फराटे संकुलात आरोग्य तपासणीस प्रतिसाद

**मांडवगण फराटा, दि. ९ (वार्ताहर)** - येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच श्री दादा पाटील फराटे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या वतीने माता सुरक्षित तर घर सुरक्षित योजनेअंतर्गत हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद मिळाला.

यावेळी डॉ. मंजुषा सातपुते यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या संस्थापक सचिव मृणाल फराटे पाटील म्हणाल्या की, आज प्रत्येक युवतीचा कल हा सकस आहार घेण्यापेक्षा फास्ट फुड घेण्याकडे असल्याचे जाणवते. हे चुकीचे असून सकस आहार घेतला तर शरीर सुदृढ राहते तसेच निरोगी शरीरात निरोगी मन रहाते. प्राचार्य प्रवीण कुरुमकर यांनी प्रास्तविक केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर फराटे पाटील, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, एमफार्मचे समन्वयक संतोष वाघमारे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. शरद शिंदे, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. जयराम पवार यांनी केले. प्रा. सोनाली म्हेत्रे यांनी आभार मानले.

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
पत्रकार-नंदकुमार पवार
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952

## वसंतराव फराटे पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

मांडवगण फराटा
जनप्रवास, प्रतिनिधी

सोमवार (दि.०५) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले या निमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त केले.

यावेळी विविध उपक्रम व स्पर्धा ही घेण्यात आल्या तसेच विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतान शिक्षकांबद्दल आदरभाव व्यक्त केला व आपल्या जीवनातील शिक्षकांचे महत्त्व विविध उदाहरणे देऊन पटवून दिले.

प्राचार्य प्रवीण कुरूमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजचा दिवस गुरु विषयी आदर भावना व्यक्त करण्याचा दिवस आहे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते त्यांच्याशिवाय विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते त्यांचे योगदानही महत्त्वाचे आहे. शिक्षकांशिवाय विद्यार्थी पूर्ण होऊ शकत नाही कारण शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य भविष्य आणि योग्य मार्गावर चालायला शिकवतो तसेच चांगल्या आरोग्याची समज शिकवतो अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना या दिवशी शिक्षकाच्या या मेहनती बद्दल आभार मानण्याची संधी मिळते म्हणून हा दिवस सर्व विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वाचा मानला जातो असे मत व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजीव फराटे पाटील,सचिव श्री मृणालताई फराटे पाटील,प्राचार्य प्रवीण कुरूमकर, बीसीए विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, बीबीएस विभागप्रमुख प्रा विजय पवळे,कला विभाग प्रमुख प्रा सुरेखा देशमुख, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा सोनाली म्हेत्रे, कार्यक्रम अधिकारी प्रा.जयराम पवार,प्रा रमेश शितोळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली मिडे व आभार नम्रता निगडे यांनी मानले.



### सुप्रीम कोर्टाच्या आदेशामुळे शिक्षकवर्गात आनंदाचं वातावरण

खासगी शाळेतील शिक्षकांना १९९७ पासूनची ग्रॅच्युइटी द्या, असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे असंख्य शिक्षकांना याचा लाभ मिळणार आहे. या आदेशामुळे शिक्षकवर्गात आनंदाचं वातावरण आहे. एप्रिल १९९७ पासून नियुक्त झालेल्या आणि पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या खासगी शाळेतील शिक्षकांना ग्रॅच्युइटीचा हक्क असेल, असा निर्णय सुप्रीम कोर्टाने गुरुवारी दिलाय. सर्वोच्च न्यायालयाने २००९ मध्ये ग्रॅच्युइटी देयक कायदा, १९७२ मध्ये केलेली दुरुस्ती कायम ठेवली आणि खासगी शाळांमध्ये नोकरी करणाऱ्या शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटीचा लाभ मिळेल, असा निर्णय दिलाय. त्यामुळे शिक्षकवर्गात सध्या आनंदाचं वातावरण आहे.

## फराटे पाटील महाविद्यालयात स्नेहमेळावा

**मांडवगण फराटा :** मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा झाला. अध्यक्षस्थानी श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठनचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील होते. माजी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा दिला. माजी विद्यार्थी हे संस्थेचे राजदूत असतात. त्यांनी महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी योगदान द्यावे, असे मत राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले. प्राचार्य प्रवीण कुरूमकर म्हणाले की, माजी विद्यार्थ्यांनी यशाची उत्तुंग शिखरे गाठली आहेत, त्याचे श्रेय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे असल्याचे नमूद केले. माजी विद्यार्थी महाविद्यालयीन काळातील आठवणीत हरवून गेले होते. सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य संदीप कोकरे, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य डॉ. विवेक सातपुते, समन्वयक प्रा. सारिका जगताप, प्रा.सोनाली म्हेत्रे प्रा. बाळासाहेब तावरे, प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. रमेश शितोळे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. जयराम पवार यांनी केले, प्रा. सारिका जगताप यांनी आभार मानले.

प्रभात पुणे, शनिवार, दि. १४ जानेवारी २०२३

## फराटे पाटील महाविद्यालयात कार्याचा जागर

**मांडवगण फराटा, दि. १३ (वार्ताहर)-** येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग,विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रवीण कुरूमकर हे होते.

कुरूमकर म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी केवळ शिवरायांनाच घडवले नाही तर असंख्य महिलांना प्रेरणा दिली. आजही महिला मुलांना घडवताना राजमाता जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतात. स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण यासाठी प्रयत्न करणाऱ्या राजमाता जिजाऊ जगभरातील माता भगिनींसाठी आदर्श आहेत. स्वामी विवेकानंद यांचे विचार आजच्या तरुणांनी आत्मसात करून आपल्या जगण्याला दिशा देणे गरजेचे आहे.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव फराटे पाटील, सचिव मृणाल फराटे पाटील, प्राचार्य विजय भांड, कला विभाग प्रमुख सुरेखा देशमुख, बी. सी. ए विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब तावरे, कार्यक्रम अधिकारी प्रा सोनाली म्हेत्रे,विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. शितल मैंद, प्रा. रेश्मा मोटे, प्रा. अक्षया मोरे, प्रा. दत्तात्रय पवार, प्रा.शरद शिंदे, प्रा. अनिल भिसे उपस्थित होते.

जाहीर नोटीस



बी.सी.ए. विभाग आयोजित अभ्यास सहल निमित्त सा.फु.पुणे विद्यापीठ येथे भेट दिली गेली त्यावेळी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



बी.सी.ए. विभाग आयोजित अभ्यास सहली दरम्यान आयुका पुणे येथे भेट देण्यात आली.



वाघेश्वर कॅलेंडर (दिनदर्शिकेचे)चे विद्यार्थ्यांना वाटप करताना प्राचार्य कुरूमकर सर व प्रा.शितोळे, प्रा.अनिल भिसे दिसत आहे.



श्री वाघेश्वर दिनदर्शिकेचे सोबत उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक वृंद दिसत आहेत.



मराठी व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित मराठी राजभाषा दिनानिमित्त प्रास्तविक करताना प्रा.दत्तात्रय पवार सर उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



मराठी राजभाषा दिन निमित्त प्रमुख व्याख्याते प्रा.रमेश शितोळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.

बी.सी.ए. विभाग आयोजित अभ्यास सहल निमित्त सा.फु.पुणे विद्यापीठ येथे भेट दिली गेली त्यावेळी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष (IQAC) अंतर्गत आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ.अमोल भगत यांचा सत्कार करताना प्राचार्य प्रविण कुरूमकर व उपस्थित प्राध्यापक वर्ग




सांस्कृतिक विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा फुळे जयंती निमित्त मार्गदर्शन करताना प्रा.रमेश शितोळे व व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य व प्राध्यापक वृंद



माजी विद्यार्थी स्नेहमेळावा प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य प्रविण कुरूमकर सर व उपस्थित प्राचार्य डॉ.काबंळे सर, प्रा.कोकरे सर व इतर



माजी विद्यार्थी स्नेहमेळावा प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य संदिप कोकरे सर मनोगत व्यक्त कराताना



माजी विद्यार्थी स्नेहमेळावा प्रसंगी उपस्थित माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्रा.सोनाली तांबे, प्रा.ऐश्वर्या दांगडे, प्रा.विकास शिंदे व उपस्थित माजी विद्यार्थी



माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कार्यक्रमाचे उद्घाटन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.संदिप कोकरे सर याप्रसंगी उपस्थित डॉ.सातपुते सर, डॉ.कांबळे सर, प्रा.कुरूमकर सर व इतर प्राध्यापक वृंद



माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्या प्रसंगी उपस्थित विद्यार्थींच्या सोबत मान्यवर प्राध्यापक वृंद



महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रतिमा पुजनासाठी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी






विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजनांची माहिती विद्यार्थींना देताना विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.रमेश शितोळे

# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मीं तरी वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२।।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सुर्यें पाहो ।
जो जें वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु या भूतां ।।४।।
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भाजिजो आदिपुरूखीं । अखंडित ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।।८।।
तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।

## EDUCATION MAKES A DOOR TO BRIGHT FUTURE.



# PHARATE PATIL GROUP OF INSTITUTES

A/p. Mandavgan Pharata, Tal. Shirur, Dist. Pune, 412211
www.swgp.org.in swgp2008@gmail.com